अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १६ जुलै २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : २८७ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## दोन दुचाकीचा अपघात; एकजण ठार

**सोलापूर** : दोन दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या अपघातामध्ये एका दुचाकीवरील ४२ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात उडगी (ता. अक्कलकोट) येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला. दत्तात्रय तुकाराम जोगद (वय ४२ रा. दत्त मंदिर शास्त्रीनगर,सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते काल सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून उडगीगाव येथून सोलापूरकडे निघाले होते. गावातील पटेल आश्रम शाळेजवळ समोरून दुसऱ्या एका दुचाकीच्या धडकेने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सैपन जमादार (मदतनीस) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र ते उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## शॉक बसून विवाहित तरुणीचा मृत्यू

**सोलापूर** : घराच्या छतावर वाळत घातलेले कपडे काढत असताना विजेच्या शॉक बसल्याने २४ वर्षीय विवाहिता उपचारापूर्वी मयत झाली. ही दुर्घटना शहरातील सेटलमेंट फ्री कॉलनी नं.१ एक येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. दीपा विकी गायकवाड (वय २४) असे मयत विवाहितेचे नाव आहे. सोमवारी दुपारी ती घराच्या छतावरील पऱ्हाळी पत्र्यावर टाकलेले कपडे काढत असताना तिच्या हाताला शॉक बसल्याने त्या खाली कोसळून बेशुद्ध झाल्या. त्यांना सनी जाधव यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्या उपचारापूर्वी मयत झाल्या.

मयत दीपा गायकवाड यांच्या पश्चात पती, एक मुलगी आणि सासू-सासरे असा परिवार आहे.त्यांचे पती विकी गायकवाड हे मजुरी करतात. या घटनेची नोंद सलगर वस्ती पोलिसात झाली आहे .

# महाराष्ट्रात मोठी राजकीय खळबळ; भूजबळ अचानक शरदरावांच्या भेटीला

राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

- महायुती अन् महाविकास आघाडीमधील सर्वच नेतेमंडळींना 'जोर का झटका'
- तिसरी आघाडी की अजित पवार गटासोबत दिलजमाईसाठी शिष्टाई ?
- राज्यात तर्क-वितर्क अन् अंदाजांना फुटले पेव
- महाराष्ट्रात राजकीय भूकंप होणार याबद्दलच्या चर्चेचीदेखील हवा

मुंबई/खास प्रतिनिधी

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरुन कालच रविवारी (ता. १४) शरद पवार यांच्यावर गंभीर आरोपाच्या तोफा डागणारे अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ हे २४ तास उलटण्यापूर्वीच सोमवारी ( ता.१५) सकाळी अचानकपणे शरद पवार यांच्या भेटीसाठी मुंबईमधील त्यांच्या सिल्व्हर ओक येथे दाखल झाले. भुजबळ आणि शरद पवार यांच्या भेटीने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाल्याचे मानलं जात आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



ते आधी शाब्दिक बॉम्ब टाकतात, नंतर बघायला जातात!

कल्याण
450-95-690

दरम्यान, तिसरी आघाडी स्थापन करण्याच्या अनुषंगाने, भूजबळ यांनी शरद पवारांची भेट घेतली की अजित पवार गटात असंतुष्ट असलेले भूजबळ राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गोटात सामील होण्यासाठी चर्चेला गेले की अजित पवार गटाचं विलीनीकरण शरद पवार गटात करण्यासाठी प्राथमिक बोलणी करायला ते गेले? या मुद्यांवर राज्यात तर्क-वितर्क अन् अंदाजांना अक्षरश: पेव फुटले. शरद पवार आणि छगन भूजबळ यांच्या अचानक भेटीनं महाराष्ट्रात राजकीय भूकंप होणार ? या मुद्यांवरुनदेखील चर्चेची हवा सुटली. (पान ६ वर)



संग्रहित छायाचित्र

"महायुतीत छगन भुजबळांची हेळसांड होत असावी, तशी शक्यता नाकारता येत नाही. तसेच यावेळी खासदार सुळे यांना भुजबळ तुमच्या पक्षात येतील का? असा प्रश्न विचारला. त्यावर खासदार सुळे म्हणाल्या, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कोण येणार? हा निर्णय संघटनेचा आहे. संघटनेतील सर्व सदस्य मिळून असे निर्णय घेतात. कुठलीही एक व्यक्ती असा कुठल्याही प्रकारचा निर्णय घेत नाही.

- **सुप्रिया सुळे,** खासदार तथा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या नेत्या

### भुजबळांनी आधी कोयत्याची भाषा वापरली : जरांगे-पाटील



मनोज जरांगे पाटील म्हणाले, आंबडला छगन भुजबळ यांनी एक मेळावा घेतला होता. त्या मेळाव्यात त्यांनी सर्वप्रथम कोयत्याची भाषा वापरली, हातपाय तोडण्याची भाषा वापरली. त्यानंतर काही ओबीसी नेते हाताखाली घेऊन भुजबळांनी ओबीसी नेते व आमच्यात वाद सुरू केले. कुकरी, कोयते व कत्त्यांची भाषा वापरली. राज्यात ही स्फोटक परिस्थिती त्यांनीच निर्माण केली आहे. गोरगरीब मराठा, गोरगरीब ओबीसी संपावे हाच या सगळ्या लोकांचा मुख्य उद्देश आहे. याबाबत कोणाला काही सांगून उपयोग नाही.

### राज्यात स्फोटक परिस्थिती निर्माण झाल्याने आलो : भूजबळ

मी कोणतंही राजकारण घेऊन आलेलो नाही. मंत्री, आमदार म्हणून आलेलो नाही. कोणतीही पक्षीय भूमिका नाही. पण महाराष्ट्रामध्ये ओबीसींना आरक्षण देण्याचं काम तुम्ही राबवलं आणि आता राज्यामध्ये काही जिल्ह्यांमध्ये स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आहे, हे सांगण्यासाठी आलो, असे आपण पवारांना म्हणालो. काही लोक मराठा समाजाच्या हॉटेलमध्ये जात नाहीत, काही लोक ओबीसी, धनगर, वंजारी, माळी समाजाच्या दुकानात मराठा समाजातील माणूस जात नाही. अशी परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे. राज्याचे एक ज्येष्ठ नेते म्हणून तुमची जबाबदारी आहे आता ही शांतता राज्यात निर्माण झाली पाहिजे, असे ही आपण त्यांना सांगितले. सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घ्या.शरद पवारांनी या चर्चेसाठी सकारात्मकता दाखवली आहे.

# बाजार समितीचे त्रांगडे कायम

## डीडीआरसह सगळेच आदेशाच्या प्रतिक्षेत

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसंबंधी आज सोमवारी (ता.१५) राज्याच्या पणन विभागाकडून आदेश येणे अपेक्षित होते. मात्र सायंकाळपर्यंत कोणताच आदेश आला नाही. त्यामुळे समितीचे त्रांगडे कायम राहिले.

दरम्यान बाजार समितीची संचालक मंडळाची मुदत तर संपली आहे. तथापि शासन स्तरावरुन कोणताच आदेश न आल्याने बाजार समितीचा कारभार नेमका कोण हाकणार? हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित झाला आहे. बाजार समितीच्या सध्याच्या संचालकांना मुदतवाढ



मिळणार की सुरु असलेल्या टप्प्यावरुन निवडणूक प्रक्रिया पुढे राबविण्यात येणार की तीन अशासकीय सदस्यांचे संचालक मंडळ अस्तित्वात आणून बाजार समितीचा कारभार हाकला जाणार? यासंबंधीचे जे औत्सुक्य बाजार समितीच्या वर्तुळात सर्वांना आहे, ते आजही कायमच राहिले.

आज सोमवारी दुपारपर्यंत बाजार समितीच्या निर्णयाचा फैसला होईल असे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी सांगितले होते. तथापि पणन विभागाकडून कोणताच आदेश आला नाही. शुक्रवारी पणन विभागाला कळविले आहे.आदेश येईल असे बोलले जात असताना कोणत्याही प्रकारचा आदेश प्राप्त झालेला नाही आणि पुढील कार्यवाही करण्याचा अधिकार जिल्हा उपनिबंधक यांना घेता येत नाही, असे सहकारी संस्था विभागाचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी आज सोमवारी (ता.१५ ) दै. 'सुराज्य'ला सांगितले.



# नेपाळची अस्थिरता...

आपल्या भारत देशाच्या शेजारी जी राष्ट्रे आहेत, त्यात नेपाळ छोटासा देश. नेपाळ आणि भारत यांच्यातील संबंध पहिल्यापासूनच सौहार्दाचे आहे. सुमारे तीन कोटींच्या या देशात पर्यटन हेच अर्थकारण. कारण नैसर्गिक देण या देशाला लाभली आहे. जगात नेपाळ हे एकमेव हिंदूराष्ट्र होते. इथे पूर्वापार राजेशाही होती. राजा जे धोरण ठरवले तोच कायदा असायचा. इथेही लोकशाही नांदते. लोकांनी निवडून दिलेले सरकार स्थानापन्न होत असते, पण त्या सरकारला राजेशाहीखाली काम करावे लागत असत पण २००८ मध्ये राजेशाही संपुष्टात आली आणि संसदीय कारभार सुरू झाला. स्वतंत्र घटना अस्तित्वात आली. नव्याने आलेल्या कारभाऱ्यांनी हिंदूराष्ट्र ही बिरुदावली देखील पुसून टाकली. तरी देखील हिंदूबहुल राष्ट्र म्हणून भारताने शेजारधर्म म्हणून या देशाला वेळोवेळी मदत केली आहे. नेपाळमध्ये प्रलंयकारी भूकंप झाल्यानंतर पहिली मदत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाठवली. नेपाळमध्ये माओवाद्यांचा शिरकाव झाला.कम्युनिस्टांचा प्रभाव वाढू लागला आहे. त्यामुळे जे सत्तेवर येतायेत, त्यांची भारताविषयीची आपुलकीची भावना बदलत चालली आहे. यामागे चीनचा हात आहे हे उघड आहे. आशिया खंडात भारताचा प्रभाव पहिल्यापासूनचा आहे. भारताचे खच्चीकरण करण्यासाठी चीनने पाकिस्तानला जशी रसद आणि ताकत पुरवली आहे तशी ती नेपाळला देखील पुरवत आहे. चीन बोले-नेपाळ हाले अशी सद्या त्या देशात राजकीय स्थिती पहायला मिळत आहे. त्या देशात द्वेषाचे राजकारण बोकाळत चालले आहे. राजेशाही संपुष्टात आणल्यापासून नेपाळला राजकीय अस्थिरतेचा शाप लागला आहे. अस्थैर्याबाबतचे एक ताजे उदाहरण देता येईल. खड्गप्रसाद शर्मा ओली हे आता नेपाळचे नवे पंतप्रधान असणार आहेत. नेपाळचे विद्यमान पंतप्रधान पुष्प कमल दहल प्रचंड यांना



शुक्रवारी (१२ जुलै) नेपाळच्या संसदेमध्ये अविश्वासदर्शक ठरावात आपले बहुमत सिद्ध करता आले नाही. २००८ साली नेपाळमधील शतकानुशतकांची राजेशाही संपुष्टात आली आणि तिथे लोकशाही सरकार स्थापन झाले. तेव्हापासून या देशामध्ये तब्बल १३ सरकारे पाहायला मिळाली आहेत. कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (युनिफाईड मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) चे अध्यक्ष के. पी. शर्मा ओली यांनी सत्तेवर दावा केला असून, लवकरच ते नवे सरकार स्थापन करतील. ते तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी परतणार आहेत. के. पी. शर्मा ओली कोण आहेत आणि ते नेपाळला राजकीय स्थैर्य देऊ शकतील का? हा खरा प्रश्न आहे. बाहत्तरीतील के. पी. शर्मा ओली हे कम्युनिस्ट विचारसरणीचे असून, त्यांनी याआधी २०१५-१६ आणि २०१८-२१ अशा दोन कार्यकाळात नेपाळचे पंतप्रधानपद सांभाळले आहे. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात त्यांनी भारताबाबत कठोर भूमिका घेतल्या आहेत; तर दुसऱ्या बाजूला त्यांच्याकडे चीनधार्जिणा नेता म्हणूनही पाहिले जाते. कार्ल मार्क्स आणि लेनिन या दोघांपासून प्रभावित झालेल्या ओली यांनी १९६६ साली कम्युनिस्ट राजकारणात रस घ्यायला सुरुवात केली. त्यांनी १९७१ मध्ये झापा बंडाचे नेतृत्व केले होते. त्यातून देशातील कम्युनिस्ट चळवळ सशस्त्र विद्रोहात बदलली होती. १९९० च्या दशकात पंचायत राजवट मोडीत काढणाऱ्या लोकशाही चळवळीतील सक्रिय सहभागामुळे ओली संपूर्ण नेपाळमध्ये प्रसिद्ध झाले. १९९१ साली झापा जिल्ह्यातून निवडणूक जिंकत ओली पहिल्यांदा नेपाळच्या संसदेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून दाखल झाले. तेव्हापासूनच ओली हे नेपाळच्या राष्ट्रीय राजकारणातील एक महत्त्वाचे खेळाडू राहिलेले आहेत. ओली हे पंतप्रधानपदी असताना नेपाळ आणि भारत या दोन्ही राष्ट्रांदरम्यान नेहमीच तणावाचे वातावरण राहिले आहे. विशेषत: २०१५ मध्ये १३४ दिवसांच्या आर्थिक नाकेबंदीदरम्यान हा तणाव शिगेला पोहोचला होता. नेपाळच्या नकाशामध्ये भारताचा भूभाग दाखविल्यानंतरही भारताबरोबरचे नेपाळचे संबंध कटू झाले होते. या काळात नेपाळचे चीनबरोबरचे संबंध अधिक दृढ झाल्याचे मानले जात होते. नेपाळच्या राष्ट्रवादाचे प्रतीक म्हणून ओली यांनी स्वत:ची प्रतिमा तयार करण्यात यश मिळविले आहे. त्यांनी २०१७ ची सार्वत्रिक निवडणूक राष्ट्रवादाच्या मुद्द्यावरच लढवली होती. नेपाळचा एकूण राजकीय इतिहास पाहता, ही युती किती काळ सत्तेत टिकून राहील आणि नेपाळला राजकीय स्थैर्य देईल, याबाबत साशंकताही आहे. ओली यांची एकूण राजकीय कारकीर्द पाहता, ते हे सरकार कशा प्रकारे चालवतील, याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

अध्यात्म

# साऱ्या विश्वाची 'विठूमाऊली'

**'श्री विठ्ठल' अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत. श्री विठ्ठलाचे भक्त म्हणजेच वारकरी विठ्ठलाला 'माउली' संबोधतात. आई ज्याप्रमाणे बाळाच्या सर्व इच्छा पुरवते, त्याचे लाड करते आणि त्याची काळजीही घेते त्याप्रमाणे विठूमाऊली तिच्या भक्तांच्या समस्त इच्छा पुरवते. भक्तांवर येणारी संकटे परतवून लावते, प्रसंगी भक्ताच्या घरी जाऊन त्याची सेवाही करते. माऊलीच्या अशाच एका भक्ताची कथा संक्षिप्त स्वरूपात आज पाहणार आहोत.**



निस्सीम भक्ती आणि पराकोटीच्या भावामुळे साक्षात विठ्ठलालाच बोलावून बंधनमुक्त करण्यास भाग पाडणाऱ्या संत सखुबाई वारकरी संप्रदायाच्या इतिहासात कायमच्या अजरामर झाल्या. कृष्णा नदीच्या काठावर कऱ्हाड या ठिकाणी पती आणि सासू-सासऱ्यांसह राहणाऱ्या सखुबाई भगवंताच्या भक्तीमध्ये सदैव लीन राहायच्या. सखूबाईंचे पती, सासू आणि सासरे या तिघांनाही सखूबाईची भगवत भक्ती रुचत नव्हती. त्यामुळे ते तिघेही तिचा पुष्कळ छळ करत; मात्र या छळाला भगवंताची देणगी मानून त्या सर्व काही सहन करत असत. एकदा कृष्णा नदीकाठी सखू पाणी भरण्यासाठी गेल्या असता त्यांना पंढरीकडे निघालेली दिंडी दिसली.

विठ्ठल दर्शनाच्या ओढीने त्याही दिंडीत सहभागी झाल्या. याविषयी त्यांच्या घरी कळताच त्यांच्या पतीने त्यांना मारहाण करत घरी आणले आणि घरात एका खुंटीला बांधून ठेवले. पंढरपूर यात्रा संपेपर्यंत त्यांना बांधून ठेवायचे, दोन सप्ताह काहीच खायला प्यायला द्यायचे नाही असे ठरवून तिघेही आपापल्या कामाला लागले. सखूंना बांधलेला दोर इतका घट्ट होता की काही दिवसांनी त्यांच्या शरीराला खड्डे पडू लागले. याही परिस्थितीत त्यांनी आर्त भावाने श्री विठ्ठलाला साद घातली, 'हे नाथा! या डोळ्यांनी तुझे एकदा जरी चरण पाहिले असते तरी मी तात्काळ प्राण त्यागले असते. मी जशीही आहे तुझीच आहे, तूच मला या बंधनातून मुक्त कर' आर्त भावाने आळवलेली सखूची हाक थेट श्री विठ्ठलाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचली.

क्षणाचाही विलंब न करता भगवंताने सुंदर स्त्रीचे रूप घेतले आणि सखूकडे गेला. स्त्री रूपातील भगवंत सखूबाईंना म्हणाला, 'मी पंढरपूरला जात आहे तुला नाही जायचे का?'

यावर सखू उद्गारल्या 'मी इथे बांधलेली आहे, माझ्यासारख्या पापिणीच्या नशिबात पंढरपूरची यात्रा कुठे?' यावर स्त्रीरूपातील भगवंत म्हणाला,'बाई मी तुझ्या पाठीशी आहे, तुझ्या जागी मी उभी राहते, माझ्या ऐवजी तू पंढरपूरला जा. असे म्हणून भगवंताने तिच्या शरीराभोवती गुंडाळलेला केवळ दोरखंड मुक्त केला नाही, तर या भवसागरातून सखूबाईंना कायमचे बंधनमुक्त केले. १५ दिवस उपाशी राहिलेल्या सखू मृत पावल्या तर आपण संकटात येऊ या भीतीने तिचे नातेवाईक सखूबाईंचे रूप घेतलेल्या भगवंताचा दोरखंड सोडतात.

पुढे सखूबाई येईपर्यंत सखूच्या जागी साक्षात श्री विठ्ठल सखूबाईंच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा करतो. भगवंताच्या सहवासाने सखूच्या पतीच्या आणि सासू-सासऱ्याच्या स्वभावात परिवर्तन होऊन त्यांच्या वर्तणुकीत पालट होतो.भावाचा भुकेला असलेल्या भगवंताने भक्ताच्या घरी जाऊन भक्ताचीच सेवा केल्याची कितीतरी उदाहरणे संत चरित्रात सापडतात. ज्याप्रमाणे सखूबाईंसाठी त्याने १५ दिवस स्वतःला बांधून घेतले, तिच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा केली, त्याप्रमाणे त्याने जनाबाईसाठी धुणी धुतली, एकनाथांच्या घरी श्रीखंड्या बनून पाणी भरले आहे.

अशी एक ना अनेक उदाहरणे आहेत.

टाकीचे घाव सोसल्याशिवाय जसे दगडाला देवपण येत नाही तसे प्रतिकूल परिस्थितीला सामोरे गेल्याशिवाय भक्ताच्या भक्तीची कसोटी लागत नाही.

संतांची चरित्रे वाचल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे सर्वच संतांनी जीवनात कितीही घनघोर संकट आले तरी भगवंताची साथ तिळमात्रही सोडली नाही. उलट या परिस्थितीत त्यांनी केवळ भगवंतालाच आळवले.

मायेतील प्रलोभने त्यांनी कधी जवळ केली नाहीत. मी भगवंताचा आणि माझा केवळ आणि केवळ भगवंत याच उत्कट भावाने त्यांनी मनोभावे उपासना केली शेवटी भगवंतालाही न राहवून भक्ताच्या साहाय्याला धावून यावेच लागते. भगवंत जसा सखूबाईंना बंधनमुक्त करण्यासाठी आला, संत गोरा कुंभारांना त्यांचे बाळ जिवंत करण्यासाठी आला, संत तुकारामांना सदेह वैकुंठात नेण्यासाठी आला. ज्ञानेश्वरांसाठी रेड्यामुखी वेद वदवण्यासाठी आला तसा तो आपल्याही साहाय्यासाठी का धावून येणार नाही? घरातील परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानाही सखूबाईंनी विठ्ठलाची आराधना सोडली नाही.

साधना करताना घरातून होणारा विरोध सहन करत आपणही भगवंताची मनोभावे साधना करतो का? ज्या आर्ततेने सखूबाईंनी श्री विठ्ठलाला साद घातली, त्या उत्कटनेने भगवंताला आपण आळवतो का? पुंडलिकासाठी जो भगवंत गेली २८ युगे एका विटेवर उभा आहे तो भगवंत आपल्या आर्त हाकेसाठी का बरे धावून येणार नाही?

**- जगन घाणेकर, मुंबई.**

टुडेज् ब्लॉग

# छंद असावा चांगला; आनंद पेरणारा

**चाकोरीबद्ध जीवनात नोकरी करताना, तेच ते काम करताना आणि तोच तो व्यवसाय करताना कंटाळा येतो. जीवन निरस आणि कंटाळवाणे बनते. जीवनात काही राम नाही असे वाटते. मानवी जीवन मिळाले आणि विना छंदाविना संपले. याची खंत कायम मनाला सलत राहते. अशी रिक्त भावना मनाला वाटू द्यायची नसेल तर जीवनात एक असा छंद आपण जोपासला पाहिजे, ज्याने आपल्या व इतरांच्या जीवनात आनंद पेरला जाईल. हे बरोबर हेरून काही सुस्वभावी व्यक्ती चांगल्या छंदात रमतात. आपले व इतरांचे जीवन सुखी करतात. सगळ्यांच्या जीवनात आनंद पेरतात. जीवनात एखादा चांगला छंद जोपासणारे लोक मी हेरले आहेत. त्यांचे छंद खरोखर प्रशंसनीय व लक्षवेधक आहेत.**

एकनाथ पलमटे, दत्तात्रय मोहिते शिवाजी वाघमारे, प्रकाश भालेराव आणि बालाजी तुरेवाले हे शिक्षक आपली नोकरी प्रामाणिकपणे करतात. फावल्या वेळात स्वतःला समाजकार्यात झोकून देतात. समाजकार्य करताना स्वतःचा पैसा खर्च करतात. त्यांचा हा छंद कित्येक व्यक्तींच्या जीवनात आनंद पेरतो आहे. बालाजी दत्तात्रय गुळवे हा सुप्रसिद्ध कवी व चारोळीकार असून तो अतिशय उत्कृष्ट कविता लिहितो आणि त्याच्या कविता आमच्या मनाला विलक्षण आनंद देतात. प्रा. राजेंद्र गुळवे हे छंद म्हणून कार्यक्रमांचे उत्कृष्ट सूत्रसंचालन करतात. विना मोबदला बौद्ध पद्धतीचे लग्न लावतात. प्रा. गोविंदराव शेळके हे मराठा सेवा संघाचे पूर्ण वेळ सक्रिय सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांनी उद्ध्वस्त होणारे अनेकांचे संसार वाचवले आहेत.


गणेशराव गुळवे गुरुजी यांना गीत लेखन व गायनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा छंद आहे. ते समाज व्यवस्थेवर परखड लेखन करतात. त्यांचे आत्मचरित्र प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन बसव प्रतिष्ठान यांनी गणेशराव गुळवे यांना राज्यस्तरीय बसवरत्न जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. पंढरपूरचे माझे एक मित्र आहेत संतोष चौंदावार. त्यांना वाचनाचा विलक्षण असा छंद आहे. माझे लेख वाचून ते न चुकता फोन करून प्रतिक्रिया देतात, विविध विषयांवर चर्चा करतात. गेल्या आठ वर्षांपासून अहमदपूर येथील माऊली ग्रुप हा पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना आठ क्विंटल चिवडा वाटप करत आहेत. अगदी हुबेहूब वारकरी वेशात हा माऊली ग्रुप फलटण जवळील निंभोरेफाटा येथे दिवसभर थांबून चिवडा वाटप करण्यात येतो. या ग्रुपमध्ये शेतकरी, व्यापारी व शिक्षक आहेत. या ग्रुपमध्ये प्रामुख्याने अरविंद कमठाणे सावकार, दत्तात्रय मोहिते सर, सुग्रीव मेकले, व्यंकटेश सोनी आणि वसंतराव सुर्यवंशी यांचा याकामी पुढाकार असतो. हा छंद आगळा वेगळा असून वारकऱ्यांना आनंदी करणारा आहे. औरंगाबाद येथे स्थायिक झालेले राजू गोरगिळे व नांदेड येथील परमेश्वर पौळ हे पर्यावरणाला जीवापाड जपतात. ते व त्यांच्या सामाजिक संस्था गोदावरी नदीची स्वच्छता करतात. शहरातील कचऱ्याचे व्यवस्थापन करणे आणि वृक्षारोपण व झाडांचे संवर्धन करणे हे त्यांचे आवडते छंद आहेत.

त्यांच्या या छंदाने इतरांनाही प्रेरणा मिळते. व्यसनात व वाईट छंदात बुडून जीवनाचे वाटोळे करून घेण्यापेक्षा चांगले छंद जोपासता आले पाहिजेत. चांगल्या छंदाने एक विलक्षण आनंद मिळतो आणि जीवनाचे सोने होऊन जाते.- **बबन गुळवे, जि. लातूर.**



जन्म हा अखेरचा

# शिष्टौदनस्थल



त्याच्यासमोर माया मोहक रूपात उभी राहत नाही. ज्याला शिवज्ञान नसतेत्याची दृष्टी मोहदृष्टी असते आणि ज्याला शिवज्ञान झालेले असते त्याची दृष्टी शिवदृष्टी असते. शिवदृष्टीला माया दिसण्याची शक्यता नाही.

**ज्योतिर्लिंगे चिदाकारे निमग्नेन महात्मना।**
**भुज्यमाना यथायोगं नश्यन्ति विषया: स्वतः।।२०.१८।।**

शिवयोगी चिद्रूप अशा ज्योतिर्लिंगात निमग्न असतो. पाण्यात बुडालेल्या मनुष्याच्या अवतीभोवती जसे पाणीच पाणी असते, त्याप्रमाणे शिवयोग्याच्या आतबाहेर केवळ शिवच भरून राहिलेला असतो. निमग्नता यालाच म्हणतात. अशा मनुष्याला महात्मा म्हणतात. ज्याच्या मनात समष्टिभावना असते, जो निःस्वार्थ असतो, सर्व प्राणिमात्राच्या कल्याणाचे जो चिंतन करतो, तोच महान आत्मा असतो. सर्व सुखी असले तर आपण सुखी राहू शकतो, सर्व निरोगी असले तर आपण निरामय जीवन जगू शकतो.

आपल्या आसपास केवळ दु:खवेदना असतील तर आपण सुखी कसे राहणार? म्हणून प्राचीन ऋषिमुनींनी 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' अशी शुभकामना व्यक्त केळी आहे. लोककल्याणाचे चिंतन ज्यांनी केले अशाच व्यक्ती महात्मा ठरल्या. शिवयोगी प्रारब्धकर्माने जे प्राप्त होते त्याचा भोग घेत असतो. इच्छा-प्रारब्ध, अनिच्छा-प्रारब्ध आणि परेच्छा-प्रारब्ध असे प्रारब्धाचे तीन भेद आहेत. आपल्या इच्छेने मागून ज्याचा भोग घेतला जातो ते इच्छाप्रारब्ध.

इच्छा नसताना दुसऱ्याच्या इच्छेने जे भोगावे लागते ते परेच्छा-प्रारब्ध. आपली इच्छा नसते, परंतु दुसरा माणूस एखादी वस्तू हाती देऊन खाण्याचा आग्रह करतो. त्याच्या इच्छेखातर आपण ती खातो. हेच परेच्छाप्रारब्ध होय. याशिवाय तिसरे असते ते अनिच्छा-प्रारब्ध. दोघांची इच्छा नसताना जे भोगावे लागते ते अनिच्छाप्रारब्ध होय.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# मविआची एकजूट किती काळ टिकू शकेल?

नुकत्याच झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीने ९ जागा मिळवून मविआच्या तोंडचे पाणी पळविले. अकरा जागांकरींता बारा उमेदवार रिंगणात उतरविल्याने निकालाची उत्सुकता वाढली होती. दोनच जागा निवडून येतील एव्हढे संख्याबळ असतानाही तिसरा उमेदवार उतरवून महायुतीची मते आपल्याकडे ओढून घेत तिसरा उमेदवार विजयी करण्याचे डावपेच यशस्वी झाले नाहीत.

म्हणजेच मविआच्या घटक पक्षांतील अपेक्षित अतिरिक्त मते महायुतीच्या उमेदवारांना दिली गेली असल्याच्या शक्यतेने आघाडीचा तिसरा उमेदवार विजयी होऊ शकला नाही. लोकसभा निवडणुकीनंतर जेमतेम दीड महिन्यांच्या कालावधीनंतर आघाडी पक्षांतील एकजूट राखली गेलेली नाही असेच दिसून आले. सोशल मीडियावरील यासंबंधीच्या वृत्तांना ज्याप्रकारे प्रसिद्धि दिली जाते.

त्यांच्या परिणामांनी देशातील जनता प्रभावित होत असते. त्याचे परिणाम राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत मतदार म्हणून कुठल्या पक्षांच्या उमेदवारांना मतदान करावे, या विचाराने लोकं संभ्रमित होणार नाहीत का याचा विचार आघाडी घटकपक्षांच्या प्रमुख नेत्यांनी आतापासूनच गांभीर्याने करण्याची गरज आहे.

अन्यथा सत्ता मिळविणे तर दूरच राहील आणि जनतेच्या मनावर पकड ठेऊ शकणारे घटक पक्ष म्हणून अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी धडपड करावी लागेल असे वाटते.

**- स्नेहा राज, गोरेगाव.**

# आनंदाचे डोही आनंद तरंग

व. पु. काळे म्हणतात, 'माणसाने समोर बसायचं की मागे यावर पुष्कळसं सुखदुःख अवलंबून असतं'. एका जुन्या लोककथेनुसार कोण्या एका गावात एका घरातील पती-पत्नी दोघेही नेहमी दुःखी असायचे. त्यांना असे वाटायचे की त्यांच्या आयुष्यात सुख कधीच येणार नाही. त्यांनी अनेक मंदिरात जाऊन देवांची पूजा केली, उपवास केले पण त्यांना सकारात्मक फळ मिळाले नाही. एके दिवशी ते आपल्या गावातील प्रसिद्ध संताकडे गेले व त्यांनी आपली समस्या त्यांना सांगितली. त्यांची समस्या ऐकताच संत अचानक उठले आणि आपल्या खोलीत गेले व तिथे त्यांनी एक खांब पकडला व जोरजोराने ओरडू लागले. त्यांचा आवाज ऐकून गावातील सर्व लोक जमा झाले. त्यांनी संताला विचारले की, 'काय झाले?' संत म्हणाले, 'हा खांब मला सोडत नाही, मी काय करू?' त्यांचे बोलणे ऐकून सर्वजण हैराण झाले. त्यांना वाटले बुद्धिमान संत मूर्खप्रमाणे का वागत आहे? सर्वजण म्हणाले, 'खांबाने तुम्हाला नाही तर तुम्ही खांबाला पकडले आहे'. संत म्हणाले, 'हे बरोबर आहे. सुख-दुःख आपल्या सवयी आहेत. आपण दुःखी राहण्याच्या सवयींला पकडले आहे. तरी ही सवय सोडा, तुम्ही सुखी व्हाल'. म्हणून आयुष्यात नकारात्मक बाबी आपण सोडून दिल्या पाहिजेत आणि सकारात्मक गोष्टींचा अवलंब केला पाहिजे. जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येकाची एकच धडपड असते ती सुखी असण्यासाठी. 'सुख पाहता जवाएवढे, दुःख पर्वताएवढे', असे संत तुकाराम म्हणतात, ते अगदी खरे आहे. चित्त वृत्ती प्रसन्न असणे यातच खरे सुख सामावलेले आहे.'

मत्तेय नावाचे फ्रेंच शास्त्रज्ञ. त्यांना एके दिवशी साक्षात्कार झाला. हे सारं मला कुठे घेऊन जाणार आहे? खरंच मी अंतर्यामी सुखी आहे का?'या सुखाचा शोध घेत घेत ते थेट तिबेटला पोहोचले. ते बौद्ध भिक्षु व नंतर मठाधिपती झाले. त्यांच्या मते सुख म्हणजे निरासक्त अवस्थेला पोहोचणे, निरपेक्ष होणे. कारण दुःखाचा उगम अपेक्षेतून होतो. सुख शरीराला आनंद देते तर आनंद मनाला चिरकाळ सुख देतो.

'जगी सर्व सुखी असा कोण आहे? विचारी मना तूच शोधूनी पाहे.' अशी आपली अवस्था झाली आहे. माणसे सेवानिवृत्त होतात पण आसक्तीतून निवृत्त होत नाहीत. त्यांची परिस्थिती 'दिल मांगे मोर' अशी होते. त्यांना भौतिक सुख मिळाले नाही तर ते दुःखी होतात. गरजा कमी करून प्रपंचातून निरासक्त व्हायचे असते. आयुष्य खूप सुंदर आहे, आणखी सुंदर बनवूया' पैसा हे साधन आहे ते जीवनाचे अंतिम ध्येय नसावे. आंधळा किंवा लंगडा माणूस आधारासाठी काठी घेतो. बालपणीचे विश्व आईमय असते, थोडे मोठे झाल्यावर मित्र हे सर्व काही वाटतात. त्याच्यापुढे बायको हे सर्व काही वाटतं आणि सर्वात शेवटी 'एकला चलो रे'.

शहाणा माणूस पैसा, बाटली या सगळ्या गोष्टी तुच्छ मानतो. तो आपल्या अंतर्मनाला मानतो. शरीर हे अन्नावर जगते. अन्नासाठी दाही दिशा. कितीही मोठा संत, ध्यानी असला तरी त्याला अन्न, वस्त्र, निवारा यांची जरुरी भासते, त्याला पैसा लागतो. मनुष्य असे पैशासाठी व भौतिक सुखासाठी म्हणजेच कार, मोठा बंगला, श्रीमंती, मोठेपणा व इतर गोष्टींसाठी धावपळ करत राहतो आणि ते न मिळाल्यास तो दु:खी होतो. पैशावर त्याच्या जीवनाचे मोजमाप होत असते. वाम मार्गाने पैसे मिळवणे अशातून आयुष्यात तो नाकर्ता, बेवडा व समाजात किंमत नसलेला माणूस बनतो व शेवटी तो आत्महत्याही करतो व समाजासाठी आणि आपल्या



घरासाठी ही तो त्रासदायक ठरतो. पैशाला व भौतिक सुखाला थोडेफार महत्त्व देऊन आत्म्याच्या समाधानासाठी व उन्नतीसाठी जो प्रयत्न करतो तो शांत आणि सुखाने जीवन जगतो. सुख हे आपल्या मानण्यावर आहे, प्लीज हॅपी, बी हॅपी. सुखासाठी : ज्या गोष्टी आपल्याला जड वाटतात, त्याचा नाद सोडा, आहे त्यात समाधानी रहा. इतरांशी पैसा, भौतिक सुख अशा गोष्टींसाठी तुलना करू नका. आपल्या आवडी जपा, छंद जपा. नेहमी सकारात्मक रहा, भविष्याच्या काळजीत वर्तमान खराब करू नका. आपल्या आवडी जपा, छंद जपा. घरात छोट्या छोट्या गोष्टींवरून भांडत बसू नका. इतरांच्या सुखदुःखात सामील व्हा. आनंद द्या. आनंद घ्या. संत तुकाराम म्हणतात, आनंदाचे डोही आनंद तरंग, आनंदची अंग आनंदाचे'. आनंदी राहा, हसत रहा, सुखी-समाधानी रहा.

**- डॉ. जे. डी. म्हेत्रे, कवठे महांकाळ**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी
# सुराज्य सोलापूर
। मंगळवार, दि. १६ जुलै २०२४ ।


## मजुराची गळफास घेऊन आत्महत्या



**सोलापूर :** एका ५८ मध्ये वर्षीय शेतमजुराने शर्टाच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कवठे (ता.उत्तर सोलापूर) येथील गायकवाड यांच्या शेतात सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. महामूद सिकंदर शेख (वय ५८ रा. शास्त्रीनगर, कवठे ) असे मयताचे नाव आहे . सकाळी ११ वाजेच्या सुमारास त्याने अशोक गायकवाड यांच्या शेतातील खोलीत छताच्या लाकडीवाशाला शर्टाने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## हुन्नूर येथे गॅस पाइप अन् चैनने मारहाण

**मंगळवेढा :** पूर्वीचे भांडण आणि समाजासाठी कामे का करतो? या कारणावरून लोखंडी चैन, गॅस पाइप आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. ही घटना हुन्नूर (ता. मंगळवेढा) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढ्याच्या पोलिसांनी दोन महिलासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सुनील दत्तू शिंदे (वय २६ रा. हुन्नुर) असे जखमीचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून बबीता आणि तिचा पती कैलास इंगोले, रंजना अरुण इंगोले आणि तिचा मुलगा राहुल इंगोले (सर्व रा.हुन्नूर) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. वरील चौघांनी सुनील शिंदे याला गावातील ग्रामपंचायत जवळील चौकात अडवून पूर्वीचे भांडण आणि समाजासाठी कामे करतो म्हणून मारहाण केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.

# अस्सल सोलापुरी उत्पादनांच्या विक्रीचा दिवसेंदिवस चढता आलेख

## ● रेल्वे स्थानकांमधील 'वन स्टेशन-वन प्रॉडक्ट'ला भरघोस प्रतिसाद

सोलापूर/दीपक शिराळकर

**सोलापुरी चादर, टॉवेल, नॅपकिन आदी वस्तुंना आजवर जागतिक बाजार पेठ मिळाली. हुतात्मा नगरीमधील या वस्तू सातासमुद्रापार पोचल्या. तिथल्या ग्राहकांच्या पसंतीस उतरल्या. दरम्यान, याच स्थानिक वस्तूंना आता रेल्वे सफरीचं नवं गिऱ्हाईक लाभत आहे. स्थानिक वस्तुंना ग्राहक मिळावा, यासाठी 'वन स्टेशन-वन प्रॉडक्ट' ही संकल्पना प्रत्यक्षात यशदायीरित्या साकारात आहे. रेल्वे प्रवाशांचं नवं गिऱ्हाईक स्थानिक वस्तूंना मिळत आहे. त्यातून अशा वस्तुंच्या विक्रीचा आलेख उंचावत आहे. परिणामी त्यातून चलनदेखील सोलापुरात येऊ लागलं आहे. विशेषत्वे, रेल्वे स्थानकांवरील वस्तू विक्रीच्या नव्या दालनांमुळे स्थानिक वस्तु उत्पादकांना आपल्या वस्तू विक्रीच्या विस्तारासाठी नवी संधी आली आहे. या संधीचं सोनं झाल्यास सोलापूरची आर्थिक स्थिती अधिक भक्कम होण्याला मदत होणार असल्याचं सध्या सकारात्मक चित्र आहे.**

- चादर, टॉवेल, नॅपकीनसह अन्य वस्तूंना रेल्वे सफरीचं नवं गिऱ्हाईक
- स्थानिक उत्पादकांना वस्तू विक्रीच्या विस्तारासाठी नवी संधी







काही महिन्यापूर्वी 'वन स्टेशन-वन प्रॉडक्ट' या योजने अंतर्गत देशातील प्रमुख रेल्वे स्थानकावर विशेष स्टॉल उघडण्यात आले आहेत.

सध्या सोलापूर मध्य रेल्वेच्या विभागात एकूण ६ स्टॉल आहेत. यामध्ये सोलापूर स्टेशन, कुर्डूवाडी, पंढरपूर, गुलबर्गा, लातूर, या स्थानकात आहेत. या योजनेमुळे सोलापुरी चादरी, सतरंजी, टॉवेल, पर्स, नॅपकिन, शेंगा चटणी, कडक भाकरी या स्थानिक वस्तुंना स्टॉलमुळे मोठया प्रमाणात मार्केट मिळत असून, सर्व स्थानिक वस्तुंना स्थानकातील प्रवाशांकडून चांगलीच मागणी होत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे सोलापुरातील उत्पादकांसाठी नव्याने संधी आली असे म्हणता येईल. तसेच सोलापुरी चादरी, शेंगा चटणी, अन् कडक भाकरी स्थानिक वस्तू व प्रसिद्ध असल्याने प्रवाशाकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

रेल्वेकडून स्थानिक व स्वदेशी उत्पादनासाठी बाजारपेठ मिळाली असून या योजनेमुळे अनेक राज्यातील विविध ठिकाणी प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांना देशात असणाऱ्या विविध संस्कृतीचा समृद्ध वारसा अनुभवण्यास मिळत आहे.

## झेडपीच्या विद्यार्थ्यांना गणवेशाची आणखी प्रतिक्षाच करावी लागणार

**● प्रा.शिक्षणाधिकारी शेख यांची माहिती**



**सोलापूर :** जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणारे गणवेश येण्यास आणखी वीस दिवस लागणार असल्याची माहिती प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

सालाबादाप्रमाणे यंदाच्यावर्षीही जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात गणवशाचे वाटप केले जाते . मात्र यंदाच्या वर्षी जुलै महिना अर्धा संपला तरी अद्याप गणवेश मिळाला नाही .त्यामुळे पालकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत प्रत्यक्ष शिक्षणाधिकारी शेख यांच्याशी संपर्क साधून चौकशी केली असता ते म्हणाले की, यावर्षी विद्यार्थ्यांना देण्यात येणारे ड्रेस हे शिवून देण्यात येणार आहेत. त्यामुळे वेळ लागला आहे. शासनाकडून वेळेत कापड मिळाले नसल्याने शिवण्यास वेळ लागत आहे. कापड जवळपास एक लाख विद्यार्थ्यांना गणेश पुरेल इतके प्राप्त झाले आहे. ते महिला विकास मंडळाकडे शिवण्यासाठी देण्यात आले आहे. तिथून शिवून झाल्यानंतर संबंधित शाळेला त्याचे वाटप करण्यात येणार आहे.

**पहिल्या टप्प्यात एक लाख विद्यार्थ्यांना गणवेश**

पहिल्या टप्प्यात जवळपास एक लाख विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप होणार आहे तर दुसऱ्या टप्प्यात पाच तालुक्यातील सर्वच विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. कुठलाही विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहणार नाही याची दक्षता शिक्षण विभागाने घेतली आहे, असे शिक्षणाधिकारी शेख यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाकडून २८५ कोटींचे अर्थसहाय्य वितरित

**● राज्य प्रमुख मंगेश चिवटे यांची माहिती**

सोलापूर/प्रतिनिधी

गोरगरीब-गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष आशेचा किरण ठरला आहे. गेल्या २ वर्षांत एकूण २८५ कोटी रुपये अर्थसहाय्य वितरित करण्यात आले आहे. ३५ हजारहुन अधिक गंभीर रुग्णांचे प्राण वाचले आहे.ना वशिला , ना ओळख थेट मदत मिळते, अशी माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य प्रमुख मंगेश चिवटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्णांना गेल्या २ वर्षांत एकूण २८५ कोटी रुपये अर्थसहाय्य वितरित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष मंत्रालय, मुंबई कार्यालयामधून तब्बल २६० कोटींपेक्षा अधिक तर नागपूर कार्यालय मधून ३० कोटी, पुणे २७ कोटी कोल्हापूर २८ कोटी ठाणे २३ कोटी सोलापूर १३ कोटी रुपये अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे. ३५ हजार हुन अधिक गंभीर रुग्णांचे प्राण वाचल्याचे चिवटे यांनी सांगितले. दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस सुरज जम्मा, राम राऊत आदी उपस्थित होते.



मंगेश चिवटे

**८६५०५६७५६७ येथे संपर्क साधावा**

रुग्णांनी अर्थसहाय्य मिळविण्याची प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क आहे. रुग्णांनी किंवा रुग्णांच्या नातेवाईकांनी स्वतः थेट अर्ज करावा आणि मदत घ्यावी. यासाठी ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळवा आणि स्वतः अर्ज करा, असे आवाहन कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले आहे.

**या योजनेत विविध २० आजारांचा समावेश**

या योजनेमध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे, असे मंगेश चिवटे यांनी स्पष्ट केले.

## नाविंदगी येथे मारहाण; २ महिलांसह ८ जखमी

**सोलापूर :** भावकीतील भांडणातून लोखंडी रॉड आणि काठीने केलेल्या मारहाणीत दोन महिलासह ८ जण जखमी झाले. ही घटना नाविंदगी (ता. अक्कलकोट) येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. रेवणसिद्ध मलकारी सलगरे (वय ४२), सोमनाथ सलगरे (वय ५२), सुमन सलगरे (वय ६५), मलकारी सलगरे (वय ७५), गजराबाई टिळे (वय ७०), श्रीराम सलगरे (वय ३९), चिदानंद वनाळे (वय ५२) आणि विश्वनाथ वनाळे (वय ६० सर्व रा. नाविंदगी (ता. अक्कलकोट) अशी जखमींची नावे आहे. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोमवारी दुपारी सर्व जखमी हे शेतात होते. त्यावेळी पूर्वीच्या भांडणावरून नागराज सलगरे आणि अन्य ८ जणांनी त्यांना मारहाण केली.

**जनगावात काठीने मारहाण**

**माढा :** भावकीतील किरकोळ भांडणातून काठी आणि बुक्क्याने केलेल्या मारहाणीत वृद्ध दांपत्य जखमी झाले. ही घटना अंजनगाव उमाटे (ता.माढा) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली.

## आषाढीनिमित्त उपवासाचे पदार्थ महाग

**● बटाटे, रताळे अन् केळी खातेय भाव | भगर, शाबूदाण्याचे दर स्थिर**

सोलापूर/प्रतिनिधी

दक्षिण काशी पंढपुरात महाराष्ट्राचं आराध्य दैवत श्री विठ्ठल रुक्मीणीची आषाढी वारीचा महासोहळा उद्या बुधवारी (ता.१७) पार पडत आहे. आषाढी एकादशीच्या निमित्तानं भाविकांकडून एकादशीचा उपवास धरला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर, बाजार पेठेत उपवासाच्या पदार्थांनी दुकाने गच्च भरली आहेत. दरम्यान उपासाच्या पदार्थाचे दर जैसे थे

संपूर्ण महाराष्ट्र वासीय, वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत विठ्ठल रखुमाईची आषाढी वारी निमित्ताने, लाखो भक्त उपवास करतात. उपवासाच्या पार्श्वभूमीवर, फराळाचे साहित्य महागले असून, कृषी उत्पन्न बाजार समिती, याऊक बाजारपेठ मधील व्यापारी दुकानदारांनी म्हटले आहे. गेल्या काही दिवसांपासून सतत पाऊस पडत आहे.काढणी, वाहतूक व इतर खर्च वाढले आहेत

फळ भाज्या आणि भाजीच्या दरात सतत वाढ होत असल्याने ग्राहकामध्ये गरजेची वस्तू कमी जास्त करून खरेदी केली जात असल्याचे किरकोळ विक्रेत्यांनी सांगितले आहे.





| वस्तू | होलसेल दर | किरकोळ दर |
|---|---|---|
| शाबूदाणा | ७० ते ८० रु.किलो | ८० ते १०० रु.किलो |
| भगर | ७० रु.किलो | १०० रु.किलो |
| शेंगा | ११० ते १३० रु.किलो | १२० ते १४० रु.किलो |
| खाद्यतेल | ११० ते १४० किलो | ११० ते १५० रु.किलो |
| खजूर | ६० ते ७० किलो | ८० ते ९० रु.किलो |
| हिरवी मिरजी | ३० ते ४० रु.किलो | ४० ते ६० रु.किलो |
| रताळे | ४० रु.किलो | ५० ते ६० रु.किलो |

शाबुदाणा तामिळनाडूमधून, भगर नाशिकच्या बाजार पेठेतून तर शेंगदाणा गुजरात मधून आयात होतो. ट्रान्सपोर्ट खर्च जास्त आहे. तरीपण यंदाच्या आषाढीच्या पार्श्वभूमीवर, फराळाच्या पदार्थांचे होलसेल आणि किरकोळ दर स्थिर आहे.

**- जगदीश भुतडा,**
हरी ब्रदर्स प्रोपरायटर

महागाई वाढल्याने ग्रहक किरकोळ म्हणजे किलो अर्धा किलोने खरेदी करत आहे.शेंगदाणा शाबुदाणा, भगर,ओली खजूर,बटाटा चिप्स हे आयते पॅकेट खरेदी केली जात आहे.

**- सरफराज डांगे,**
डांगे किराणा स्टोअर्स, सोलापूर

बटाटा, हिरवी मिची रताळे तसेच फळाचे दर सरासरी ४० रुपये ते किलो आणि १२० रुपये डझन याप्रमाणात आहेत. रुपयांच्या महागाई वाढल्याने गिऱ्हाईकाकडून किलोच्या भावाची फक्त चौकशी होते. मात्र पाव किलो तसेच अर्धा किलोची खरेदी गिऱ्हाईकाकडून होते.

**- जैतूनबी शेख,**
फळ-भाजी विक्रेते, मरीआई चौक,

## पडसाळी येथील जोगेश्वरी मंदिरातून दागिन्याची पेटी गायब

**सोलापूर :** बंद दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्याने मंदिरातील दागिन्याची पेटी पळवली. ही चोरी पडसाळी (ता. उत्तर सोलापूर) येथील भैरवनाथ जोगेश्वरी देवीच्या मंदिरात रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. पडसाळी (ता.उत्तर सोलापूर) येथे भैरवनाथ जोगेश्वरी देवीचे मंदिर आहे. रविवारी सकाळी उत्तम भालेकर हे पूजा करण्यासाठी मंदिराजवळ गेले असता त्यांना मंदिराचा लोखंडी दरवाजा आणि त्याला लावलेले कुलूप तुटलेले दिसले. त्यानंतर त्यांनी आत जाऊन पाहणी केली. तेंव्हा मंदिराच्या गाभाऱ्यातील देवीच्या बाजूस असलेली पत्र्याची पेटी गायब झाल्याचे दिसून आले. त्या पेटी एक ग्राम सोन्याचे मंगळसूत्र, चांदीचे डोळे,लिंग आणि इतर साहित्य असा ३५ हजाराचा माल होता. अशा आशयाची फिर्याद भैरव मारुती भालेकर (रा.पडसाळी) यांनी पोलिसात दाखल केली आहे.




**पत्नीचा मोबाईल नंबर मागून पतीस सत्तुरने मारहाण**


**पंढरपूर :** पत्नीचा मोबाईल नंबर का मागितला? असा जाब विचारल्याच्या कारणावरून सत्तुर आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणी तरुण जखमी झाला. ही घटना भाळवणी (ता.पंढरपूर) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी चौघांजणावर गुन्हा दाखल केला आहे . प्रतीक बलभीम गायकवाड (वय २० रा. भाळवणी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला मारहाण केल्याप्रकरणी गुंडा कांबळे, त्याचा भाऊ दादा कांबळे, वडील भारत कांबळे आणि अंबिका भारत कांबळे (सर्व रा.भाळवणी) या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# शेतजमिन वाटपावरुन भांडणं करणं टाळा; 'अशी' घेता येईल कायदेशीर वाटणी करुन!

सोलापूर/प्रतिनिधी

**आजही देशभरात अनेक शेतकरी कुटुंबांमध्ये भावंडांची जमीन वडिलांच्या किंवा आजोबांच्या नावावर असते. अशावेळी अनेकदा जमिनीवरून वाद होतात आणि ते शेतीच्या वाटणी करण्यापर्यंत पोहचतात. मात्र, अशावेळी शेत जमिनीचं वाटप कसं करतात? शेत जमीन वाटपाचे कायदे काय? कायदेशीर जमीन वाटपाची पद्धत काय याची अनेकांना माहितीच नसते. त्यामुळे याच शेत जमिनीच्या वाटपासंबंधी प्रक्रियांचा दैनिक 'सुराज्य'नं आपल्या वाचकांसाठी घेतलेला हा आढावा.**




**शेतजमीन वाटपाची नेमकी पद्धत तर कशी?**

साधारण ज्या व्यक्तीच्या नावावर जमीन आहे त्याचा मृत्यू झाला आणि संबंधित व्यक्तीने कोणतंही मृत्यूपत्र केलेलं नसेल, तर ही सर्व जमीन मृत व्यक्तीच्या वारसदारांकडे जाते. वारसदारांमध्ये या व्यक्तीची मुलं आणि पत्नीचा समावेश असतो. यानुसार, हे वारसदार तलाठ्यांकडे जाऊन वारस म्हणून नोंदीसाठी अर्ज करू शकतात. मात्र, वारसदारांना एकत्रित मालकी ऐवजी स्वतंत्र मालकी हवी असेल तर त्यासाठी परस्पर संमतीने जमिनीचे खातेफोड करता येते. जर सर्वसंमती नसेल तर यासाठी सिव्हिल कोर्टात दावा दाखल करता येतो. त्यानंतरच जमिनीचे वाटप होऊ शकते.

**वाटणीला परवानगी मिळाल्यानंतर पुढे काय करावं?**

न्यायालयाने संबंधित जमीन वाटपाचे आदेश दिल्यानंतर गावातील तलाठ्यांना या जमीन वाटपाचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देते. यानंतर तलाठी एकूण जमीन आणि वारसांच्या संख्येप्रमाणे जमिनीच्या वाटपाचा प्रस्ताव तयार करतात. यात सर्व वारसदारांना आपल्या जमिनीपर्यंत रस्ता आहे की नाही अशा गोष्टींचाही विचार केला जातो. प्रस्ताव सादर झाल्यानंतर सर्व वारसदारांची सहमती घेऊन त्याला मान्यता दिली जाते. मात्र, वारसदारांना प्रस्ताव मान्य न झाल्यास अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित महसूल अधिकारी किंवा न्यायालयाला असतात.

**जमिनीच्या वाटपासाचं प्रकरण कोणत्या कोर्टात चालतं?**

जमिनीच्या वाटपासाठी सर्वात आधी वारसदाराला तालुक्याचे महसुल अधिकारी असलेल्या तहसिलदारांकडे किंवा न्यायदंडाधिकाऱ्यांकडे अर्ज करता येतो. अर्ज करताना अर्जदाराला तो संबंधित जमिनीचा वारस आहे हे सिद्ध करणारे कागदपत्र देखील सादर करावे लागतात. अर्ज दाखल झाल्यानंतर सर्व वारसांना नोटीस बजावली जाते. तसेच हजर राहून त्यांची बाजू मांडण्यास सांगितलं जातं. सर्व बाजू ऐकून आणि कागदपत्रांची शहानिशा करून न्यायालय वाटणीबाबत निर्णय देते.

# शासकीय दरापेक्षा जादा पैसे घेतल्यास खबरदार

● आयडी होणार बंद
● ऑनलाईन केंद्र चालकांनो दरपत्रक लावणे गरजेचे

मंगळवेढा/प्रतिनिधी

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागातील सेतू चालक, महा-ई-सेवा केंद्र, आपले सरकार आदींमधून 'माझी लाडकी बहीण' व अन्य शासकीय योजनेसाठी शासनाने ठरवून दिलेल्या शासकीय दराशिवाय जादा पैसे घेतल्यास त्या सेवा केंद्रांचा आयडी बंद करण्याचा इशारा महसूल प्रशासनाने दिला आहे. दरम्यान नागरिकांच्या तक्रारींवरून तात्काळ पडताळणी करण्यात येणार असल्याचे महसूल प्रशासनाकडून सांगण्यात आले.



महाराष्ट्र शासनाने २१ते६५ वयोदरम्यान असलेल्या स्त्रियांसाठी 'माझी लाडकी बहीण' ही योजना अंमलात आणली असून शहर व ग्रामीण भागातील सेतू केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, आपले सरकार आदी ठिकाणी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी त्या केंद्राला जत्रेचे स्वरूप येत असल्याचे चित्र आहे. त्याचबरोबर पिक विमा फॉर्म भरणे, आधार कार्ड काढणे, उत्पन्नाचा दाखला, डोमीसाइल, जातींचा दाखला, इडब्ल्यूएस दाखला, पॅन कार्ड व अन्य शासकीय योजनांसाठी दाखले काढण्यासाठी नागरिकांना गरजेचे असल्याने विविध केंद्रामधून ते ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करतात. यावेळी संबंधित केंद्र चालकाकडून शासकीय दरापेक्षा जास्तीची रक्कम मागणी करत असल्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रारी प्राप्त होत आहेत.

या तक्रारींवरून महसूल प्रशासन अधिकाऱ्यांनी यावर नियंत्रण रहावे याकामी लेखी पत्र काढून सर्व केंद्रांना सदर दाखल्याकरीता केवळ शासकीय फी घेण्यात यावी अन्यथा आपला आयडी बंद करण्यात येईल, अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान शासकीय फी व्यतिरिक्त जादा रक्कम घेतल्यास नागरिकांनी महसूल प्रशासनाकडे तक्रारी कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. बसस्थानक परिसरात असलेल्या केंद्रामधून आधारकार्ड काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी नागरिकांच्या असून येथे बाहेरच्या राज्यातील व्यवसायासाठी आलेल्या नागरिकांनाही येथील रहिवाशी म्हणून अव्वाच्या सव्वा हजारोंच्या आकड्यात दामाजी घेऊन आधारकार्ड दिल्याची खमंग चर्चा या परिसरात होत असून महसूल अधिकाऱ्यांनी या केंद्राची पडताळणी करून कारवाई करावी, असा आग्रह सुज्ञ नागरिक करीत आहेत. येथे बनावट शिक्केही वापरले जात असल्याचीही खमंग चर्चा आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या केंद्राकडे प्रशासनाचे लक्ष नसल्याने येथे अंधाधुंद कारभार सुरू असल्याचा सुर जनतेमधून येत असल्याने हा सर्व प्रकार थांबणे गरजेचे असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# सर्वसामान्य, वंचित, उपेक्षित शेतकऱ्यांसाठी डाळिंब केंद्राचा पुढाकार : डॉ. राजीव मराठे



उत्तर सोलापूर : डाळिंब संशोधन केंद्राच्यावतीने साहित्य वाटप करताना डॉ. राजीव मराठे, संग्राम धुमाळ, संभाजी दडे, विनायक सुतार आदी.

उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

वंचित, उपेक्षित प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी डाळिंब संशोधन केंद्र कायम पुढाकार घेत आले आहे, यापुढेही तो घेऊ, असे मत राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे केंद्रसंचालक डॉ. राजीव मराठे यांनी कारंबा (ता. उत्तर सोलापूर) येथे केले.

राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्यावतीने अनुसुचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी मोफत कृषीनिविष्ठांचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विश्वकर्मा सोशल फाउंडेशनच्या साह्याने हा उपक्रम घेतला. डाळिंब संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. संग्राम धुमाळ, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शिल्पा परशुरामी, शास्त्रज्ञ रुपा सौजन्य, विश्वकर्मा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक सुतार, भाजयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष संभाजी दडे, सोसायटीचे सदस्य भागवत कत्ते, संजय आदाटे, कृषी सहायक ज्ञानदेव गोडसे, शरीफ शेख, ग्रामपंचायत सदस्य कमल पाटील, कैलास कांबळे, सुहास भोसले, अनिल सुतार, अमोल सुतार, बाळासाहेब माने, सत्तार शेख, सुखदेव कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, राजू कदम, शिवशंकर नारायणकर आदी उपस्थित होते.

डॉ. मराठे म्हणाले, 'डाळिंब केंद्राचे कार्यक्षेत्र देशभर आहे. डाळिंबाच्या लागवडीपासून व्यवस्थापनापर्यंत सर्वप्रकारचे तांत्रिक मार्गदर्शन आम्ही करतो. शेतकऱ्यांनी कधीही आमच्याकडे यावे, आम्ही वेगवेगळ्या भागात असे उपक्रम राबवतो. प्रास्ताविक विश्वकर्मा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक सुतार यांनी केले. सूत्रसंचालन सुहास भोसले, आभार बाळासाहेब माने यांनी मानले.

**उत्तर सोलापुरातील आठ गावात वाटप**

कारंबा, साखरेवाडी, अकोलेकाटी, गुळवंची, खेड, बीबीदारफळ, नान्नज, राळेरास या गावातील अनुसूचित जाती प्रवर्गातील ४० शेतकऱ्यांना प्रत्येकी सुमारे १५ हजार रुपये किंमतीच्या कृषीनिविष्ठांचे मोफत वाटप करण्यात आले. त्यात सेंद्रिय तसेच रासायनिक खते, किटकनाशक-बुरशीनाशक, संजीवके, शैवाल खते या कृषीनिविष्ठांसह कामगंध सापळ्यांचा समावेश आहे.

# खोटी माहिती पसरवल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याची मागणी

कळमण/प्रतिनिधी

तालुका उत्तर सोलापूर येथे साखरेवाडी मध्ये साखरेवाडी गावासाठी विकास करण्याकरता उत्तर सोलापूर पंचायत समितीमार्फत निधी उपलब्ध केला जातो परंतु बंदिस्त गटार बांधण्यासाठी निधी आलाच नाही किंवा त्याची वर काढलंच मिळाली नसताना गावातील काही समाजकंटकांकडून व्हाट्सअप सुप्रभात साखरवाडी ग्रुप वर खोटी माहिती घेऊन संपूर्ण गावाला संभ्रमात ठेवण्यासाठी षडयंत्र रचण्यात येत असल्याचे दिसून येत आहे व्हाट्सअप सुप्रभात साखरेवाडी या ग्रुपवर बंदी आणून त्याच्या एडमिनवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी साखरेवाडीची उपसरपंच रेवनसिध्द उर्फ पप्पू साखरे यांनी जिल्हाधिकारी व पोलीस निरीक्षक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

दुसऱ्या का गावच्या कामाचे फोटो दाखवून गावात जनतेमध्ये माझ्याविषयी रोज निर्माण केला जात असल्याचाही आरोप प लेखी निवेदनाद्वारे पप्पू सागरी आणि केला आहे अशा बऱ्याच वेळा बातम्या खोट्या सुप्रभात साखरेवाडी या ग्रुपवर टाकत असल्याने व ग्रामपंचायतीची बदनामी करण्याचे कटूकारस्थान काही समाजकंटक करत आहेत त्यांना तात्काळ सजा द्यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे या सर्व गोष्टींचा विचार करून वरील अधिकाऱ्यांनी शहनिशा करून स्वतः लक्ष घालून न्याय द्यावा अशी मागणी केली आहे.

# पाकणी येथे बाल दिंडी संपन्न

उत्तर सोलापूर : उत्तर तालुक्यातील पाकणी जिल्हा परिषद शाळेत आषाढी वारी निमित्त बाल दिंडी काढण्यात आली. दिंडीमध्ये विठ्ठल रुक्मिणी यांच्याबरोबरच संतांचा पेहराव करून मुलांनी सहभाग घेतला होता. सदरच्या दिंडीमध्ये मुलांच्या बरोबरच गावातील प्रतिष्ठित नागरिक,गावचे सरपंच बालाजी येलगुंडे व ग्रामपंचायत सदस्य, भजनी मंडळाने यामध्ये सहभगी होते.

# सर्व्हर डाऊन असल्याने शेतकरी पीक विमा भरण्यापासून वंचित

**मुदत वाढविण्याची मागणी**

पिलीव/प्रतिनिधी

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात खरीप हंगामातील पिकांसाठी शासनाने एक रुपयात पीक विमा भरण्याची आज अंतिम दिवस मात्र, सर्व्हर डाऊन असल्याने अनेक शेतकऱ्यांना पीक विमा भरुन या योजनेत सहभागी होता आले नाही. अनेक शेतकरी पीक विमा भरण्यासाठी सकाळपासून महा-ई-सेवा केंद्रात मोठ्या संख्येने बसले होते. मात्र, सर्व्हरच सुरु नसल्याने शेतकऱ्यांची घोर निराशा झाली. करू तर शेतकऱ्यांसाठी ही अतिशय महत्वाकांक्षी योजना आहे. खरे पण ग्रामीण भागातील शेतकरी सदरच्या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम दिवशी जातात. शेवटचा दिवस असल्याने नेटवर्क व सर्व्हर बंद असल्याने अनेक शेतकरी या योजनेत सहभागी झाले नाहीत. शासनाने पीक विमा योजनेची मुदत वाढविण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

# ताहेरा फाउंडेशनतर्फे वारकऱ्यांना छत्र्यांचे वाटप

अकलूज/प्रतिनिधी

'अकलूज येथील ताहेरा फाउंडेशन' या सामाजिक संघटनेने अनेक समाजोपयोगी विधायक उपक्रमास सदैव प्राधान्य दिले आहे. त्याच अनुषंगाने दि.१२ जुलै रोजी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या आषाढी वारीनिमित्त अकलूज येथे पालखीचे आगमन झाले. आषाढी वारीत पायी चालणाऱ्या वारकऱ्यांचा पावसापासून बचाव व्हावा, या उद्देशाने ताहेरा फाउंडेशनच्यावतीने व विजया सुधाकर पंधे यांच्या हस्ते छत्र्यांचे वाटप करण्यात आले



अकलूज : सामाजिक बांधिलकी जपत ताहेरा फाउंडेशनने वारकऱ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

आषाढी वारीतील वारकऱ्यांना आवश्यकता कशाची आहे हे जाणून अकलूज पंचक्रोशीत सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या ताहेरा फाउंडेशनच्यावतीने व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नामवंत उद्योगपती संतोष सुधाकर पंधे व त्यांच्या सौभाग्यवती तसेच दिलीप किसनराव होनमाने आणि त्यांच्या सौभाग्यवती यांच्या हस्ते 'श्रीं'ची आरती करण्यात आली तसेच संत तुकाराम महाराज पालखीतील सहभागी झालेले व देहू येथून पायी आलेल्या वारकऱ्यांना माळीनगर रोड येथील गणेश मोटर्स येथे जेवणाची व राहण्याची सुविधा करण्यात आली होती. या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्या विजया सुधाकर पंधे यांचा सन्मान ताहेरा फाऊंडेशनचे अध्यक्ष हाजी अबुबकर तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी दिंडी प्रमुख हभप नारायण खेसे महाराज, उद्योगपती संतोष सुधाकर पंधे (संगम) धनगर समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष दिलीप होनमाने, ताहेरा फाउंडेशनचे अध्यक्ष - हाजी अबूबकर तांबोळी, तसेच मोठ्या संख्येने वारकरी भाविक उपस्थित होते. उपस्थित वारकऱ्यांच्या सेवेसाठी ॲड. स्वप्निल होनमाने, छगन निचळ, कामिल शेख, अमोल घुले, संतोष रणदिवे, रवी सोनवणे यांनी परिश्रम घेतले.



रुक्मिणी हिची मंत्रालय येथे लिपिकपदी निवड झाल्याबद्दल उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# रुक्मिणी जाधवची मुंबई मंत्रालय येथे लिपिकपदी निवड

**उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सन्मान**

वेळापूर/प्रतिनिधी

वेळापूर गरुड बंगला येथे, बोंडले (ता. माळशिरस) येथील रुक्मिणी पंढरीनाथ जाधव यांची महाराष्ट्र शासन, मुंबई मंत्रालय येथे लिपिकपदी निवड झाल्याबद्दल, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

रुक्मिणी जाधव वडिलांच्या निधनानंतरही अत्यंत बिकट परिस्थितीत रुक्मिणीचा शिक्षणाचा संपूर्ण भार उत्तमराव जानकर यांनी उचललेला होता. दिव्यांग असताना जिद्द न हरता हे यश तिने मिळविल्याबद्दल परिसरात तिचे कौतुक होत आहे. या सत्कार सोहळ्याप्रसंगी माजी नगरसेवक सेवक माळशिरस आप्पासाहेब देशमुख, लोखंडे (खुडूस), डॉ. रमेश माने, राजाराम जाधव उपस्थित होते.

# वीररत्न शिवा काशीद यांना अभिवादन

परंडा/प्रतिनिधी

स्वराज्याच्या संरक्षणासाठी आपल्या बलिदानाची आहुती देणारे शिवाजी महाराजांचे विश्वासू मावळे वीर शिवा काशीद हे इतिहासात कायम अजरामर झाले. जन्माला शिवाजी काशीद म्हणून जन्मले असले तरी शेवटच्या क्षणी शिवाजी महाराजांच्या नावाने वीरमरण पत्करले हे लाख मोलाचे आहे, असे मत प्रसिध्द शिवव्याख्याते शरद नवले यांनी व्यक्त केले. वीररत्न शिवा काशीद यांच्या स्मृतीदिनानिमित्त शनिवार दि. १३ रोजी शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ला येथे अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शिवव्याख्याते शरद नवले व मेजर महावीर तनपुरे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सिद्दी जौहारने शिवाजी महाराजांना कैद करण्यासाठी पन्हाळगडाला वेढा दिला होता. या कैदेतून राजांची सुटका करण्यासाठी शिवाजी महाराजांचा हुबेहूब वेष परिधान करुन सिध्दी जोहारला भेटण्यासाठी गेलेल्या वीर शिवा काशीद यांना प्राणाचे बलिदान द्यावे लागल्याचा इतिहास आहे.

यावेळी शिवव्याख्याते शाहीर शरद नवले यांनी ऐतिहासिक दाखले देत वीर शिवा काशीद यांच्या जीवनकार्याविषयी माहिती सांगितली.

यावेळी मेजर महावीर तनपुरे, मनोज चिंतामणी, प्रकाश काशीद, प्रमोद वेदपाठक, विशाल काशीद, मनोज शहाणे, संतोष भालेकर, ॲड. काशीद, विरेंद्रबाबी काशीद, मयुर डाके, आकाश काशीद, करण काशीद, महेश ऐतवाडे उपस्थित होते.



परंडा : ऐतिहासिक भुईकोट किल्ला येथे वीररत्न शिवा काशीद यांना अभिवादन करताना शिवशाहीर शरद नवले,मेजर महावीर तनपुरे, प्रकाश काशीद, मनोज चिंतामणी आदी.

# रैयान मणेरी सीए परीक्षेत उतीर्ण

सांगोला/प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या चार्टर्ड अकाऊटंट परीक्षा २०२४ मध्ये सांगोला येथील मणेरी गल्ली येथील रहिवाशी एक मार्केट यार्डमध्ये काम करणारा मजूर जिलानी मणेरी यांचे रैयान मणेरी हे सीए परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले आहे.



२०१८ साली रैयान मणेरी यांनी सीए जुबेर मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथे सीएचे शिक्षण सुरू केले. हालाखीची परिस्थिती असून न खचता सीए परीक्षा उत्तीर्ण झाले. वडील जिलानी मणेरी यांचे कष्ट आणि शिवणकाम करणारी आईचे कष्ट आणि आशीर्वाद आणि मित्रमंडळीचा सपोर्ट यांच्या जोरावर रैयानने अवघड अशी परीक्षा सर केली.



वेळापूर गरुड बंगला येथे परभणीचे खा. बंडू जाधव यांचा सन्मान

# वेळापूर गरुड बंगला येथे खा. बंडू जाधव यांचा सन्मान

वेळापूर/प्रतिनिधी

वेळापूर गरुड बंगला येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात परभणी लोकसभा मतदारसंघाचे खासदार बंडूभाऊ जाधव वेळापूर येथे आले असता त्यांनी गरुड बंगल्यास भेट दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते उत्तमराव जानकर यांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख विश्वस्त, मान्यवर-पदाधिकारी यांच्यासाठी अन्नदानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष आळंदी राहुल चिताळकर-पाटील युवा नेते पृथ्वीराज खुटवड (फुरसुंगी), दादाराजे घाटगे, निवृत्ती भुसारे वस्ताद, जगन्नाथ वाघमारे, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा विश्वस्त आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या शिष्टाईमुळे धनगर समाजाचे आंदोलन स्थगित

**अद्याप एक मागणी शासन स्तरावर प्रलंबित**

पंढरपूर/प्रतिनिधी

धनगर समाजाने त्यांच्या विविध मागण्यांसाठी आषाढी एकादशीच्या शासकीय पूजेच्या वेळेस आंदोलन करण्याचा इशारा दिलेला होता, त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर येथे धनगर समाजाच्या शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा केली.

शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांच्याकडे पंढरपूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळा सुशोभिकरणासाठी निधी उपलब्ध करणे, दुसरी मागणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने सांस्कृतिक भवनसाठी जागा व त्यासाठी निधीची तरतूद, तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर धनगर समाजातील तरुणांना उद्योग व्यवसायासाठी बिना व्याजी व विना कारण तीस लाखापर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देणे अशा तीन मागण्या केल्या.

शिष्टमंडळाच्या तीन मागण्यांपैकी पहिल्या दोन मागण्या जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी तात्काळ मान्य केल्या व तिसरी मागणी ही शासन स्तरावरील असून त्याबाबत शासनाशी चर्चा करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी शिष्टमंडळाच्या प्रतिनिधीला सांगितले व उपरोक्त दोन मागण्या मान्य करून पुढील एका महिन्याच्या आत त्या पूर्ण होणार असल्याने धनगर समाजाने आषाढी एकादशीला करण्यात येत असलेले आंदोलन मागे घ्यावे, असे त्यांनी सांगितले.

या सर्व पार्श्वभूमीवर धनगर समाजाच्या शिष्टमंडळांतील उपस्थित प्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांनी स्वतः पुढाकार घेऊन शिष्टमंडळाच्या तीनपैकी दोन मागण्या मान्य केल्याबद्दल समाधान व्यक्त करून त्यांनी ही सकारात्मक भूमिका स्वीकारून तूर्तास आंदोलन मागे घेत असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री महोदयांच्या भेटीनंतर पुढील दिशा ठरविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुनसिंह भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे तर धनगर समाज शिष्टमंडळाचे विश्रांती भुसनर, माऊली हलनवर, आदित्य फत्तेपूरकर, सुभाष मस्के, सोमनाथ ढोणे, पंकज देवकाते, प्रशांत घोडके, संजय लवटे, प्रसाद कोळेकर, अजय देशमुख, सतीश लवटे व अन्य प्रतिनिधी उपस्थित होते.



पंढरपूर : पंढरपूर येथे धनगर समाजाच्या शिष्टमंडळाकडून सकारात्मक प्रतिसाद

# रस्त्यावरील खड्ड्यात वृक्षारोपण करुन नगरपालिका प्रशासनाचा निषेध

## सांगोल्यात नागरिकांनी निद्रिस्त प्रशासनाचे वेधले लक्ष

सांगोला/प्रतिनिधी

**सांगोला शहरातील मेन रोड ते कडलास नाका जाणाऱ्या व भोपळे रोड, वाढेगाव नाक्यावर जाण्यासाठी जोडणाऱ्या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची चाळण झाली आहे. याकडे निद्रिस्त नगरपालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी खड्ड्यातच वृक्षारोपण करुन निषेध व्यक्त केला.**

दोन्ही रस्त्यांची दुरुस्ती वा डांबरीकरण व्हावे, अशी मागील वर्षापासून या परिसरातील लोकांकडून मागणी केली जात आहे; मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे संतप्त शहरवासीयांनी शासनासह लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण केले आहे. रविवारी आठवडा बाजार असल्याने या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात



सांगोला : खड्ड्यात वृक्षारोपण करुन निषेध

रहदारी असताना या वृक्षारोपणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. सांगोला शहरातील मेन रोड ते कडलास नाका अर्थात मुजावर गल्ली यांसह कोष्टी गल्ली आदी लोकवस्ती आहे. हाच मेन रोड सांगोला- मिरज, सांगोला जत या महामार्गांना जोडला जातो. हायस्कूल, दवाखाने व इतर कामांसाठी ये- जा करण्यासाठी या रोडचा अनेकजण उपयोग करतात. या रस्त्यावरून छोट्या-मोठ्या वाहनांची नेहमीच मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांनी रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यात पाणी साचून राहिल्याने लोकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे वाहने खड्ड्यांत जाऊन अपघात घडत आहेत. रस्त्यावरुन चालणेही मुश्कील झाले आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी रस्त्यामध्ये वृक्षारोपण करून रोष व्यक्त करीत, शासनासह लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधले आहे. खड्डेमय झालेल्या रस्त्याची तत्काळ डांबरीकरण व्हावे अशी अपेक्षा केली आहे.

### भुयारी गटारीच्या नावाखाली रस्त्यांची दुरावस्था

भुयारी गटारीच्या नावाखाली शहर व उपनगरातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने अनेक अपघात घडले आहेत. यामध्ये वाहनांचे नुकसान झाले आहे. याबाबतही वारंवार सांगूनही प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याने, सर्व स्तरातून संताप व्यक्त केला जात आहे.

---

## संक्षिप्त वृत्त

### नागरिकांसाठी विविध उत्पादनाचे स्टोर सुरु

**सोलापूर** : स्टार,ए टाटा एंटरप्राइजने आपला विस्तार करत सोलापुरात नवीन स्टोर जमश्री कंपाऊंड दमानी नगर,मरीआई चौक येथे सुरु केले आहे.सोलापुरातील नागरिकांच्या गरजा भागवतील अशा विविध उत्पादनांची विशाल श्रेणी याठिकाणी उपलब्ध करवून देण्यात आली आहे. सोलापुरातील नवीन स्टोर उत्तम दर्जाची उत्पादने अतुलनीय किमतींना उपलब्ध करवून देण्याच्या स्टारच्या मिशनमधील एक महत्त्वाचा टप्पा आहे.विविध प्रकारची लागणाऱ्या आवश्यक वस्तू,झुडीओ ब्रँडचे कपडे आणि ऍक्सेसरीज अशी अनेक विविध प्रकारची उत्पादने याठिकाणी खरेदी करता येतील.



सोलापूर : जाधव, मोकाशी यांच्या सत्कार प्रसंगी अनिरुद्ध पवार, चंदारानी आतकर.

### हरी जाधव, अनिरुद्ध मोकाशी यांचा प्राथमिक शिक्षक संघातर्फे सत्कार

**सोलापूर** : राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष हरी जाधव यांची माढा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी निवड, माढा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे माजी चेअरमन अनिरुद्ध मोकाशी यांची सेवानिवृत्ती निमित्त दोघांचा सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने मोडनिंब येथे सत्कार करण्यात आला. राज्य न.पा,मनपा शिक्षक संघाचे सरचिटणीस संजय चेळेकर, जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पवार, महिला जिल्हाध्यक्षा चंदाराणी आतकर, जिल्हा सरचिटणीस सूर्यकांत हत्तूरे (डोगे), जिल्हा कार्यकारी अध्यक्ष रणजीत थिटे, जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे संचालक रमेश शिंदे,मोहोळ अध्यक्ष महावीर उन्हाळे, मंगळवेढा अध्यक्ष संभाजी तानगावडे, मंगळवेढा तालुका पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन धनाजी नागणे, शिवाजी लेंडवे, राम म्हमाणे, लेंडवे, माढा महिला आघाडी अध्यक्षा चंद्रकला नागणे, सिमिंता कुंभार, माढा तालुका संघाचे अध्यक्ष संजय काशीद आदी उपस्थित होते.

-------------

### सोलापुरात रविवारी मिशन ब्युटी सुंदर मी होणार स्पर्धा

**सोलापूर** : प्रख्यात नामवंत स्त्री त्वचा रोग संघटना आणि सोलापूर आकाशवाणी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरात प्रथमच मिशन ब्युटी सुंदर मी होणार ही आरोग्यदायी त्वचा व सौंदर्य स्पर्धा रविवार दि. २१ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ ते ६ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संयोजक डॉ. स्मिता चाकोते यांनी पत्रकार परिषदेत दिली. रविवारी सम्राट चौक येथील चाकोते कॉस्मेटो केअर सेंटर, श्रीपाद वल्लभ कुंज येथे फक्त स्त्रियांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी शंभर रुपये प्रवेश फी आहे. १६ ते २९ वर्ष प्रिन्सेस, ३० ते ४९ वर्षे सिल्वर आणि ५० वर्षांवरील गोल्ड या तीन वयोगटात ही स्पर्धा होणार आहे. आरोग्यदायी सुंदर सुदृढ त्वचा, आकर्षक केस आणि उत्कृष्ट व्यक्तिमत्व या निकषावर ही स्पर्धा होणार आहे. या विशेष स्पर्धेमध्ये एकूण ७० स्पर्धकांचा सहभाग राहणार आहे. आठ त्वचारोग तज्ञ परीक्षक म्हणून काम पाहणार आहेत. रविवार दि. २८ जुलै २०२४ रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे या स्पर्धेचा पारितोषिक पारितोषिक वितरण सोहळा होणार आहे. पत्रकार परिषदेस डॉ. कांचन उकरांडे डॉ. मिताली मोरे, डॉ. मानसा बोल्ली, डॉ. तृप्ती खटावकर, डॉ. श्रुती स्वामी, वैशाली म्हसवेकर आदी उपस्थित होते.

---

## आमदार शहाजी पाटील यांनी जाणून घेतल्या जनतेच्या अडचणी

### गुडघेदुखीच्या आजारातून बरे झाल्यानंतर लगेच लागले कामाला

सांगोला/प्रतिनिधी

गुडघेदुखीच्या आजारातून बरे झाल्यानंतर आमदार शहाजीबापू पाटील यांनी संपर्क कार्यालयात उपस्थित राहून जनतेच्या अडचणी समस्या जाणून घेतल्या. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून योजनांची, विकास कामांची माहिती घेत अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर संपर्क कार्यालयात उपस्थित झाले. त्यानंतर त्यांनी तात्काळ सर्व विकासकामांचा आढावा घेतला. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह सर्व शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. गुडघेदुखीचा त्रास



सांगोला : जनतेच्या समस्या जाणून घेताना आ.शहाजी पाटील.

असतानाही आ. पाटील यांनी माढा लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचाराची धुरा खांद्यावर घेत पायाला भिंगरी बांधून प्रचार यंत्रणा राबविली. मात्र, या प्रचाराच्या धावपळीत गुडघेदुखीचा आजार बळवल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रुग्णालयात जावून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. तसेच अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही भेट घेवून तब्येतीची विचारपूस केली होती.

आजारातून बरे झाल्यानंतर आमदार शहाजीबापू पाटील चिकमहूद गावी आले. विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्यासाठी विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी विधीमंडळात दाखल झाले. यावरून आमदार शहाजीबापू तब्येत ठणठणीत झाल्याने सोमवारी (दि.१५) आ. पाटील यांनी संपर्क कार्यालयात उपस्थित राहून जनतेच्या अडचणी, समस्या जाणून घेतल्या.

यावेळी उपस्थित नागरिकांनी देखील बापूंच्या तब्येतीची विचारपूस करून काळजी घेण्याची विनंती केली. यावेळी शहाजीबापूंनी पीक विमा, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, नवमतदार नोंदणी अभियान, दुष्काळ निधीचे वाटप, खरीप हंगामातील पेरण्या, प्रगतीपथावर असलेली विकास कामे , पाणीपुरवठा, जनजीवन मिशन योजनेंतर्गत सुरू आहे.

---

## विधानसभा लढवणारच; पक्ष जनता ठरवेल

### ॲड.अभिजित ढोबळे यांची घोषणा

**मोहोळ** : मोहोळ विधानसभा मतदारसंघात वंदन परिक्रमा काढल्यानंतर मतदारसंघातील युवक आणि ग्रामस्थांकडून निवडणूक लढवण्याचा आग्रह होत आहे. त्यामुळे आपण मोहोळ किंवा पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक आखाड्यात उतरण्याचा निर्णय घेतला आहे, अशी घोषणा महात्मा फुले अनुसूचित जाती जमाती सूतगिरणीचे चेअरमन अभिजित ढोबळे यांनी मोहोळ येथे पत्रकार परिषदेत केली.



अभिजीत ढोबळे यांनी गेल्या पंधरा दिवसांपासून मोहोळ विधानसभा मतदारसंघात मतदार वंदन परिक्रमा या यात्रेच्या आयोजन केले होते, त्यावेळेस त्यांची ही घोषणा होते की काय याकडे लोकांचे लक्ष लागले होते. अपेक्षाप्रमाणे त्यांनी ही घोषणा केली. ढोबळे म्हणाले की, या १० दिवसात गावातील समस्या मला लोकांनी नव्याने सांगितल्या. वास्तविक या समस्या मला पूर्वीपासूनच माहिती आहेत. आणि माझ्या वंदन परिक्रमेतील समता, बंधूता याचा भाव बघून लोकांनीच मला विधानसभा निवडणूक लढवण्याचा आग्रह केला आहे. लोकांच्या विनंतीचा आदर करून मी हा निर्णय घेतला आहे.

---

## जैन सोशल ग्रुपतर्फे रविवारी मोफत नेत्र तपासणी शिबिर

सोलापूर/प्रतिनिधी

येथील जैन सोशल ग्रुपच्या वतीने रविवारी (दि.१८) सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर असल्याच अध्यक्ष गौतम छाजेड आणि संयोजक रमेश डाकलिया यांनी सांगितले.

तुळजापूर वेस, बलिदान चौक येथील जैन स्थानक येथे हे शिबिर होणार आहे. अनोपचंद डाकलिया, कमलाबाई अनोपचंद डाकलिया, प्रकाशचंद डाकलिया, रतनचंद डाकलिया, सुनितादेवी डाकलिया यांच्या स्मरणार्थ हे शिबिर होत आहे. डॉ. नवनीत तोष्णीवाल यांच्या हस्ते आणि मिश्रीबाई तोष्णीवाल नेत्रपिढी यांच्या सहकार्याने शिबिर होत आहे. शिबिरात मोतीबिंदू आढळल्यास त्याचा पुढील उपचार डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मोफत तपासणी करणार आहे.

नाव नोंदणीसाठी राजेश निमाणी, निमाणी टेक्स्टाईल चाटी गल्ली ९८ २२ ०३ ८८ ००, उन्मेश करनावट - वर्धमान नगर , ९८ २३ ०१० ४२०, महिपाल ओसवाल- सिद्धेश्वर मार्केट यार्ड ७२७६ ४९ ८० ९८, राजेश शहा- रोनक ,नवी पेठ, सोलापूर ९३ ७० ४६ ६६ ७८ या ठिकाणी संपर्क साधावा. जास्तीत जास्त गोरगरीब - गरजूंनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन रमेश डाकलिया यांनी केले आहे. यावेळी महेश नळे, उन्मेश करनावट संजय सेठीया उपस्थित होते.

---

## ऑर्किड महाविद्यालयास स्वायत्त दर्जा प्राप्त

### प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे फळ : प्राचार्य सोनगे

सोलापूर/प्रतिनिधी

नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून ऑटोनॉमस (स्वायत्त) दर्जा प्राप्त झाल्याचे प्राचार्य डॉ. बी.के.सोनगे यांनी सांगितले.


अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरावी अशी गौरवास्पद गोष्ट असून सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि समर्पित कर्तव्य भावनेचे फळ आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दहा वर्षांसाठी ही स्वायत्त प्रणाली लागू झाली आहे. स्वायत्त दर्जामुळे नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभियांत्रिकीचा



अभ्यासक्रम तयार करणे व राबविणे, अभियांत्रिकी उद्योगाच्या वाढत्या गरजा पूर्ण करणाऱ्या अभिनव शिक्षण पद्धती विकसित करणे, कुशल व्यावसायिकांची मागणी पूर्ण करण्यासाठी नवीन आणि वैशिष्ट्यपूर्ण अभियांत्रिकी कार्यक्रम, स्वतःचे रोजगारक्षम पदवी व पदविका अभ्यासक्रमे, स्वतंत्र परीक्षा पद्धती इत्यादी गोष्टी यात अंतर्भूत आहेत. याचा फायदा सोलापूर शहर, जिल्हा व परिसरातील विद्यार्थी, पालक आणि उद्योजकांना होणार असल्याचे ऑर्किड समूहाने सांगितले आहे. ऑटोनॉमस प्रणाली लागू झाल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष अंकुश चव्हाण, सचिव विलास पाटील व सर्व विश्वस्तांनी प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

> नॅकमधील ए प्लस मानांकन, विद्यार्थ्यांच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये प्लेसमेंट, पीएच.डी. व अनुभवी प्राध्यापक वर्ग, इंडस्ट्री स्पॉन्सर्ड प्रोजेक्टस, विद्यार्थ्यांचा विविध स्पर्धामध्ये सहभाग, विद्यार्थी व प्राध्यापकांचे रिसर्च पेपर्स, पेटंटमध्ये विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा सहभाग, अद्ययावत लॅब आणि स्पोर्ट्स सुविधा या महाविद्यालयातील बाबींचा ऑटोनॉमस दर्जासाठी फायदा झाला.
>
> **- डॉ.व्ही.के.पत्की,**
> आय.क्यु.ए.सी. समन्वयक
>
> ऑटोनॉमस दर्जाने इंडस्ट्री ओरिएंटेड अभ्यासक्रमामुळे शैक्षणिक गुणवत्तेत वाढ, परीक्षा मुल्यमापनाचा वेग व गुणवत्ता वाढल्यामुळे निकाल लवकर मिळतील. प्रवेश प्रक्रियेतील जागा वाटपामध्ये स्थानिक विद्यापीठ आणि इतर विद्यापीठ अशा प्रकारे विभागणी होणार नाही. पाठ्यक्रमाचे वारंवार अद्यतन केल्याने शैक्षणिक वातावरणात गती येईल. विद्यार्थी व प्राध्यापकांच्या गुणवत्तेत वाढ होईल.
>
> **- डॉ. मिथून पाटील,**
> ऑटोनॉमस समन्वयक

---



सोलापूर : जुळे सोलापूर परिसरातील कृष्णा कॉलनी येथील साई पॅराडाईज व्यापारी संकुलातील सुमेध पेट फूडस् शॉपीचे उद्घाटन करताना प्रमोद गायकवाड, डॉ.बबनराव कांबळे, सुरेश चितारी, डॉ. करण कांबळे, डॉ. सोनिया कांबळे आदी मान्यवर.

## सुमेध पेट फूडस् शॉपीचे जुळे सोलापुरात थाटात उद्घाटन

सोलापूर/प्रतिनिधी

जुळे सोलापूर परिसरातील ओम गर्जना चौक भागातील कृष्णा कॉलनी साई पॅराडाईज व्यापारी संकुलातील सुमेध पेट फूडस् शॉपीचे उद्घाटन माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते थाटात झाले.

या शॉपीचे माध्यमातून पेट, कॅट यांच्यासाठी दर्जेदार आणि रास्त दरात फूडस् उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे प्रमोद गायकवाड यांनी उद्घटनावेळी सांगितले. या शॉपीमुळे जुळे सोलापूर, सैफुल परिसरातील नागरिकांची सोय होत असल्याचेही ते म्हणाले. या कार्यक्रमासाठी कृष्णा कॉलनी रहिवासी संघटनेचे मुख्य प्रर्वतक सुरेश चितारी, सदस्य सेवानिवृत्त प्रा. रावसाहेब देशमुख, सब्बन शिंपी, ओम चौधरी, डॉ.कृष्णात भोसले, साई पॅराडाईज गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष मंगेश डंके, महापालिकेचे आरोग्य निरीक्षक शिंदीबंदी, डॉ. प्रसाद, डॉ. बोधनकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. पाहुण्यांचे स्वागत आणि प्रास्ताविक सुमेध पेट क्लिनिकचे संचालक तथा जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त पशुधन विकास अधिकारी डॉ.बबनराव कांबळे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. करण कांबळेसह कांबळे परिवारातील सदस्यांनी केले होते.

**शैक्षणिक**

**प्रवेश! प्रवेश! प्रवेश!**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ संलग्न १० वी/१२ वी पास नापास-मुलींसाठी नर्सिंग कोर्स. स्व.राहुल गायकवाड मेमोरियल नर्सिंग ट्रेनिंग कॉलेज. संपर्क : साई नगर, डोणगाव रोड, सोलापूर.
एस.एल.गायकवाड मो.९०११२०८०००,
शिवलाल जाधव मो.९०२५५००१००

---

## 'सतनाम सतकबीर' पुस्तकाचे नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन

सोलापूर/प्रतिनिधी


निवृत प्रादेशिक परिवहन अधिकारी डॉ.डी. टी पवार यांच्या, 'सतनाम सतकबीर', 'सेफ ट्रॅव्हल' या पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. नितीन गडकरी यांच्या नागपूर निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमाला सेवानिवृत्त उप प्रादेशिक परिवहन अधिकारी डॉ. डी.टी. पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

रस्ते वाहतुक महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, रस्ता सुरक्षेसाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. रस्ता सुरक्षेचे नियम पाळा, लोकांमध्ये कायद्याची भीती आणि आदर असायला हवा. लाल सिग्नल असेल तर थांबावे.लेन शिस्तीवर बोलताना गडकरी म्हणाले की, इथे लोक कोणत्याही लेनवर चालतात, लेनची शिस्त खूप महत्त्वाची असते. सरकारने अपघात घडणाऱ्या सुमारे ४ हजार ब्लॅक स्पॉट्स शोधून काढल्या आहेत. त्यात सुधारणा करत आहोत. याशिवाय रोड सेफ्टी ऑडिट करत आहोत. नितीन गडकरी म्हणाले की, रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करण्याचे काम करत आहोत, मात्र अद्याप यश मिळालेले नाही. आम्ही, ऑटोमोबाईल क्षेत्र,



नागपूर : डॉ.डी.टी.पवार यांच्या सतनाम सतकबीर पुस्तकाचे प्रकाशन करताना केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी व इतर मान्यवर

शैक्षणिक संस्था आणि सामाजिक स्वयंसेवी संस्था लोकांमध्ये जागरूकता वाढवण्याचे काम करत आहोत. सगळ्यात 'महत्त्वाची बाब म्हणजे यासाठीचे कार्यक्रम शाळा-महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर आयोजित केले जात आहेत. मानवी वर्तन बदलेल तेव्हाच ही मोहीम यशस्वी होईल. डॉ. डी. टी. पवार यांचे रस्ता सुरक्षतेसाठी नवनवीन उपक्रम राबविले त्याप्रमाणे घेण्यास सुरु आहे. रस्ता सुरक्षेसाठी प्रबोधन तीस वर्षापासून काम चालु आहे. मंत्री नितीन गडकरी यांनी डॉ. डी. टी. पवार यांच्या पुस्तकांचे कौतुक केले व भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



> लोकांनी रॅश ड्रायव्हिंग केल्यास अपघात होऊन त्यांचा जीवही जाऊ शकतो, याची जबाबदारी लोकांना घ्यावी लागेल. कधीकधी मला खूप वाईट वाटते की सुशिक्षित लोक रस्ता ओलांडण्यासाठी रस्त्याच्या मधोमध घुसतात. या लोकांना समजून घ्यायचे आहे आणि आम्हाला समजावून सांगायचे आहे की, तुमचे जीवन खूप महत्वाचे आहे.
>
> **- डॉ.डी.टी.पवार,**
> सेवानिवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी

---



सोलापूर : वर्धापन दिनाप

## मातोश्री हत्तुरे पतसंस्थेकडून गुणवंतांचा सत्कार

**दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगीतील मातोश्री कै. शांताबाई हत्तुरे महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त गुणवंत शालेय विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी वृक्षारोपणही करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून दिलीप पतंगे हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक काशिनाथ भतगुणकी, बसवकन्याच्या अध्यक्ष ऋतुजा अंदेली, उद्योजक शिवानंद हत्तुरे, सरपंच विनोद बनसोडे, चेअरमन अश्विनी हत्तुरे, व्हाईस चेअरमन सरस्वती कोटे, मुख्याध्यापक सुरेश नेलोरे, विलासराव देशमुख, चनमल्लाप्पा चिट्टे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी पतसंस्थेचे व्यवस्थापक राजशेखर बंडगर, राजकुमार देशमुख, सोमनिंग घोडके, वैष्णवी उपासे, रेवन सनके, जगदीश दसाडे आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीपकुमार धुळवे आणि मौलाली शेख यांनी केले तर आभार शशिकांत उपासे यांनी मानले.



# आषाढी एकादशीनिमित्त सेवासदन प्रशालेमध्ये अभंगवाणी कार्यक्रम

**सोलापूर** : आषाढी एकादशीनिमित्त सेवासदन प्रशालेमध्ये अभंगवाणी कार्यक्रम पार पडला. विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम, कान्होपात्रा, जनाबाई, संत ज्ञानेश्वर, गोरा कुंभार, मुक्ताबाई अशा संतांच्या वेशात विद्यार्थिनींची दिंडी काढण्यात आली. रिंगण सोहळाही करण्यात आला. शिक्षिका टाळमृदुंगाच्या गजरात दिंडीत सहभागी झाल्या होत्या. गवळण, भारुड, जात्यावरच्या ओव्या, अभंग, वासुदेव गीत आदी सादर करण्यात आली. अतिशय भक्तिमय वातावरणात विठ्ठलाच्या नामाचा गजर करण्यात आला. उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, शिक्षिका मीरा केंद्रे, शैलजा खांडेकर, स्मिता कोर्टीकर, सोनाली कुलकर्णी, अश्विनी वाघमोडे, ज्ञानेश्वर काळे, सतीश घंटेनवरू, संगीत शिक्षक विलास कुलकर्णी तसेच विद्यार्थिनींनी अभंगवाणी कार्यक्रमात अभंग सादर केले. कविता वाचन पेशवे यांनी केले.तबला वादन अयाचित व हार्मोनियम वादन विलास कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन मराठी विभागप्रमुख लक्ष्मी कमळे व मीरा केंद्रे यांनी पाहिले. मार्गदर्शन राजेश्री रणपिसे यांनी केले. सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, चिटणीस वीणा पत्की यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी सुंदर दिंडी नृत्य सादर केले. मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, शिक्षक प्रतिनिधी सतीश घंटेनवरू, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

---

## दौंडमधून उजनीमध्ये २१ हजार क्युसेकचा विसर्ग

**सोलापूर** : पुणे जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे दौंडमधून उजनी धरणात २१ हजार क्युसेकचा विसर्ग येवून मिसळत आहे.सोमवारी दुपारपर्यंतची आकडेवारी असून अजून विसर्ग वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या तीन-चार दिवसांपासून उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच धरणाच्या वरच्या बाजूस पुणे जिल्ह्यातील बहुतांशी भागात मुसळधार पाऊस पडत आहे.भीमाशंकर डोंगर,पवना या भागातही संततधार पाऊस पडत आहे.त्यामुळे भीमा नदीला पाणी आले असून दौंडमधून २१ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिळसत आहे. अजून प्रवाह वाढल्यास येत्या आठवडाभरात उजनीची वाटचाल प्लसकडे होईल,असे सांगण्यात आले.उजनीची सध्याची पाणी पातळी - ३० टक्क्यांपर्यंत आली आहे.

# सांगोल्यात जुनअखेर ९० टक्के पेरण्या

## तालुका कृषी अधिकाऱ्यांची माहिती; २० हजार हेक्टरवर पेरणी

**सांगोला/प्रतिनिधी**

यंदा जून महिन्यात प्रारंभीच चांगला पाऊस पडल्याने सांगोला तालुक्यात खरिपाच्या ९० टक्के पेरण्या जुनअखेरपर्यंत पुर्ण झाल्या आहेत. गेल्या खरिपाच्या तुलनेत यंदा वाढ असून बाजरी, तूर, मका, सूर्यफूल या प्रमुख नगदी पिकांचा पेरा वाढल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे यांनी दिली आहे.

चांगल्या पावसानंतर कृषी विभागाच्या नियोजनानुसार शेतकऱ्यांनी पेरणीला सुरूवात केली. मागील वर्षी सोलापूर जिल्ह्यात पेरणीयोग्य व समाधानकारक पाऊस न झाल्याने खरिपाची पेरणी अत्यंत कमी क्षेत्रावर झाली होती. परंतु यावर्षी जिल्हा मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने पेरण्याही वाढल्या. जिल्ह्यातच यंदा खरीप पेरणी क्षेत्र वाढणार असल्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. सांगोला तालुक्यात एकूण सरासरी २२ हजार ७१९ हेक्टर क्षेत्र आहे. या क्षेत्रापैकी २० हजार ५६० हेक्टर क्षेत्रावर २६ जून अखेर ९०.५० टक्के पेरणी झाली आहे.

मात्र, अनेक ठिकाणी पावसाने उघडीप दिल्यासारखे चित्र दिसत आहे. अनेक ठिकाणी दमदार पाऊस झालेला असला तरी विहीरी, बोअरवेलच्या पाणी पातळीत फारशी वाढ झालेली नाही. यामुळे पेरणी झालेली पिके सध्या तरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत.



### कृषी विभागाच्या मोहिमांचा फायदा

कृषी विभागाने घेतलेल्या बीजप्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता तपासणी, घरच्या बियाण्यांचा वापर, जनजागृती, शेतीशाळा या मोहिमांचा चांगला उपयोग झालेला आहे. घरच्या बियाण्यांच्या वापराबाबतच्या मोहिमांमुळे बियाणे खरेदीवर यंदा ताण आला नाही.

### यंदा मक्याच्या सर्वाधिक उत्पादनाची शक्यता

सर्वाधिक मका पिकाची १२ हजार ४८९ हेक्टरवर पेरणी झाली आहे. परिणामी तालुक्यात यावर्षी मक्याचे सर्वाधिक उत्पन्न होणार असल्याचे चित्र सध्यातरी दिसून येत आहे.



नातेपुते : धान्य वाटप प्रसंगी उत्तम जानकर, पांडुरंग देशमुख, दादासाहेब घाडगे, माऊली पाटील, संदीप ठोंबरे आदी.

# संदीप ठोंबरे मित्र परिवारातर्फे वारकऱ्यांना धान्य वाटप

**नातेपुते** : संदीप ठोंबरे मित्र परिवार नातेपुते यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना दोनशे किलो पोहे तसेच ५ हजार पिण्याच्या पाणी बाटलींचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे संचालक उत्तम जानकर, पांडुरंग देशमुख, दादासाहेब घाडगे, माऊली पाटील, माजी ग्रा.पं. सदस्य संदीप ठोंबरे, विशाल साळवे, सागर बिचुकले, बाबा काळे, राहुल सावंत, राहुल बोराटे, शुभम सोरटे, गणेश काटे, सुरज सांगण, अनिल रुपनवर, सागर देवडे, गणेश काटकर, राकेश पिसे, शब्बीर नदाफ, सुरज शेंडगे, गणेश ठोंबरे, अमरजीत जानकर, नसीर तांबोळी, राकेश पिसे, नितीन पिसे, सचिन वेळापूरे, पप्पू ढोबळे, मामा भांड, मयूर देवडे, निखील सावळकर, काव्या ठोंबरे, ओमराजे ठोंबरे,

# युवक काँग्रेस अक्कलकोट तालुकाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांचा राजीनामा नामंजूर

### जिल्हाध्यक्षांकडून लोकसभेतील कामाचे कौतुक

**अक्कलकोट** : युवक काँग्रेस अक्कलकोट तालुकाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांचा राजीनामा नामंजूर केल्याचे पत्र जिल्हाध्यक्ष सूनंजय पवार यांनी दिले आहे.

लोकसभा निवडणुकीत युवक काँग्रेसने अक्कलकोट तालुक्यात चांगले काम केले असून बाबासाहेब पाटील यांनी टीमला सोबत घेऊन चांगल्या प्रकारे मेहनत घेतल्याने पक्ष मजबूत होत आहे. बाबासाहेब पाटील व त्यांचे सहकारी युवक काँग्रेसचे सर्व पदाधिकाऱ्यांचे कुठलेही काम,अडचणी सोडविण्यासाठी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व मी स्वतः तुमच्यासोबत असल्याचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार यांनी म्हटले आहे.



अक्कलकोट : बाबासाहेब पाटील यांना राजीनामा नामंजूर केल्याचे पत्र देताना माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व अन्य पदाधिकारी.

बाबासाहेब पाटील म्हणाले की, काँग्रेस पक्ष मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील असून यापुढे युवकांची कुठलीही समस्या सोडविण्याचे आश्वासन माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार यांनी दिले आहे. येत्या विधानसभा निवडणुकीसाठी युवक काँग्रेसचे सर्व पदाधिकारी आणि आमची टीम कामाला लागली आहे.

यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार, जि.प. सदस्य मल्लिकार्जुन पाटील, युवक काँग्रेस अध्यक्ष बाबासाहेब पाटील, सुनील खवळे, विनीत पाटील, मुजीप नदाफ, इराण्णा धसाडे, राहुल साळुंखे, अयाज चंदनवाले, आकाश निंगदल्ले, राहुल मोरे, नितीश राठोड, संदीप चव्हाण, वसीम कुरेशी, कशीनाथ लोड्डेनौर, रतन बिराजदार आदी उपस्थित होते.

# कुर्डूवाडीत चातुर्मास मंगल प्रवेशप्रसंगी शोभा यात्रा

**कुर्डुवाडी** : कुर्डुवाडी शहरात जैन साध्वी मंगलज्योती वरक्षाज्योती यांचा चातुर्मासनिमित्त प्रवेश झाला.यावेळी महावीर भवन जैन स्थानक ते कुबेर मंगल कार्यालय अशी भव्य शोभा यात्रा काढण्यात आली.

पंचरंगी ध्वजा घेतलेला बालचमु, मंगल कलश व चौदा स्वपन देखावा घेतलेल्या श्राविका, भगवान महावीराचे तैल चित्र असलेली सजवलेली बग्गी, घोषणा पथक, श्रावक अशी शोभा यात्रा मिरवणूक काढण्यात आली.

शोभा यात्रेच्या अग्रभागी अध्यक्ष अभिजित धोका, निलेश संचेती, घेवरचंद बाठिया, हरकचंद डागळे, भागचंद डागळे, राजेश बलदोटा, राजकुमार धोका, विजयकुमार धोका, विलास संचेती, ॲड प्रेमचंद संचेती, सुहास शहा, चेतन शहा, प्रकाश शहा, संकेत दोशी, प्रवीण संचेती, राहुल धोका, दिलीप बिनायकिया, यश डागळे, डॉ. घेवरचंद धोका, श्रीपाळ धोका, श्रवण सुराणा, अमित सोळंकी, राहुल सोळंकी, महावीर बाठिया, आनंद कोठारी, संतोष धोका, प्रकाश धोका, किरण धोका, चेतन संचेती, चंपालाल सोनिमिंडे, आनंद धोका, श्रेणिक धोका आदी वर्धमान जैन मंडळ, चंदनबाला महिला मंडळ , सुशील बहु मंडळ, विहार ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

# कन्नड सदाबहार गीतांनी रसिक तृप्त

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ वर्धापन दिनाचे चौथे पुष्प



अक्कलकोट : श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी यांचा सत्कार करताना अमोलराजे भोसले.

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

श्री गणेश वंदना..!, केळीसदे कल्लू कल्लीनल्ली...!, कन्नड रोमांचन कन्नड..!अशी कन्नड भावगीतं, भक्तीगीतं, चित्रपट गीतांनी गायक राजेश कृष्णन यांच्या 'संगीत संजे' या सदाबहार कार्यक्रमाने श्रोते भारावले होते. निमित्त होते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. रविवारी (दि. १४) सायंकाळी ७ वाजता श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी व श्री बसवलिंग महास्वामी यांच्या आशिर्वादाने गायक राजेश कृष्णन व निवेदिक अनुपम भट आणि सहकारी बेंगळूरु यांचा 'संगीत संजे' या कन्नड कार्यक्रमाने चौथे पुष्प गुंफले गेले.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी व विरक्त मठाचे मठाधिपती बसवलिंग महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात डॉ. शरणबसप्पा दामा व त्यांच्या पत्नी, मल्लम्मा पसारे, उद्योजक बसवराज माशाळे, दत्तकुमार साखरे, अक्कलकोट लायन्स क्लबचे अध्यक्ष शिवानंद नंदर्गी, माजी नगरसेवक लक्ष्मीकांत धनशेट्टी, कन्नड साहित्य परिषदचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी, राजशेखर उमराणीकर, राजकुमार झिंगाडे यांच्याहस्ते करण्यात आले. श्रींची प्रतिमा, नटराज व दिवंगत लता मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी अन्नमंडळात आल्यानंतर स्वागत न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी केले. महास्वामींनी महाप्रसादालयाची पहाणी करून समाधान व्यक्त केले. याप्रसंगी राजेश कृष्णन, पृथ्वी भट, सहगायक संतोष देव, रविराज, नटराज शेट्टीकेरे व निवेदिक अनुपम भट आणि सहकारी बेंगळूर यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्याहस्ते पूजन झाले. यावेळी न्यासाचे विश्वस्त अलका भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, रुपाली रामदासी, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, मनोज निकम, प्रा.शरणप्पा आचलेर, अरविंद शिंदे, शीतल फुटाणे, राजु नवले, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, सौरभ मोरे, ॲड.संतोष खोबरे, अविनाश मंगरुळे, प्रमोद लोकापूरे, कांत झिपरे, चेतन साखरे, सिद्धेश्वर मोरे, विठ्ठल तेली, सुरेश पाटील, सायबण्णा जाधव, बाळासाहेब घाटगे, प्रसाद हुल्ले, बसवराज क्यार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले. उत्कृष्ट लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केली.

### मोठ्या बहिणीच्या घरी छोट्या बहिणीचा कार्यक्रम

आज कन्नड गीतांची कार्यक्रम महाराष्ट्रात होत असून हे म्हणजे मोठ्या बहिणीच्या घरी छोट्या बहिणीचा कार्यक्रम आहे, असे आहे. राजेश कृष्णन व सर्व संगीत कलाकारावर श्री स्वामी समर्थ कृपाशीर्वाद सदैव राहील असे लिहून श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी यांनी आशीर्वचन दिले.

### गुणीजन गौरव

विशेष गौरव पुरस्कार ज्योतिष अभ्यासक पंचय्या स्वामी व सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक इरेश बागेवाडी, अक्कलकोट घडामोडीचे धोंडप्पा नंदे, उपशिक्षक गुरुय्या बसलिंगय्या सलगर यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

### गुणवंत विद्यार्थी गौरव

तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ७ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.



करमाळा : कामगार महिलांना भांडी वाटपप्रसंगी जमलेल्या महिला.

# लाडकी बहीण योजनेचे २५ हजार अर्ज शिवसेना मोफत भरणार : महेश चिवटे

**करमाळा** : लाडकी बहीण योजनेचे २५ हजार अर्ज शिवसेना मोफत भरणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी करमाळ्यातून विधानसभेला शिवसेनेचा उमेदवार निवडून द्या, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केले.

मुख्यमंत्र्यांची लाडकी बहिण योजनेचे अर्ज भरणे प्रारंभ व बांधकाम कामगार महिलांना भांडी वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्योगपती सुनील चोरडिया, शिवसेना मुस्लिम आघाडी बीड जिल्हा समन्वयक सय्यद मन्सूर पटेल, तालुकाप्रमुख राहुल कानगुडे, शहरप्रमुख संजय शीलवंत, शिवसेना महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख ज्योती शिंदे, उपतालुकाप्रमुख सुनीता गोडगे, जेऊर शहरप्रमुख माधव सूर्यवंशी, जेऊर युवासेना शहरप्रमुख बाळासाहेब करचे, शाखाप्रमुख बाबासाहेब तोरणे, संजय जगताप आदी पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमत्र्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी महिन्याला तीन हजार रुपये जाहीर केले आहेत. शिवसेनेकडून त्याचेही फॉर्म मोफत भरून घेतले जात आहेत, असेही चिवटे यांनी सांगितले.





सांगोला : बैठकीत मार्गदर्शन करताना आ. सचिन कल्याणशेट्टी, यावेळी चेतनसिंह केदार सावंत यांच्यासह अन्य पदाधिकारी.

# बूथ रचना मजबूत करण्याची गरज : आ. सचिन कल्याणशेट्टी

**सांगोला/प्रतिनिधी**

केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी राबविलेल्या योजना सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचविल्या पाहिजेत. भाजपाला मजबूत करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी बूथ रचना मजबूत करण्याची आवश्यकता आहे. सक्षम कार्यकर्ता हीच भाजपची खरी ताकद असल्याचे प्रतिपादन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

अर्थ संकल्प मांडणी व बूथ कार्यरचना या योजनेच्या अनुषंगाने सांगोल्यात पदाधिकारी बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते शिवाजी गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष संभाजी आलदर, उत्तर मंडल अध्यक्ष अतुल पवार, दक्षिण मंडल अध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, बूथ रचना संयोजक लक्ष्मण केंकान, प्रदेश कार्यकारणी सदस्य गजानन भाकरे, लोकसभा विस्तारक अनंत राऊत, सरचिटणीस शिवाजी ठोकळे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत म्हणाले, भाजपची ध्येयधोरणे निश्चित करून कार्यकर्ते सर्व सामान्यांपर्यंत पोहचवत असतात. प्रत्येक बूथची ताकद ५१ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठी बूथ प्रमुखाने कामाला लागावे. कार्यकर्त्याने सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. पक्ष संघटन वाढीसाठी मंडल अध्यक्ष व पदाधिकारी यांनी बूथ प्रमुख व शक्ती केंद्र प्रमुख नियुक्ती करताना भाजपाचाच असला पाहिजे अशीही सूचना चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

# बार्शी बाजार समितीच्या निवडणुकीत बोगस मतदार नोंदणी

## ▶▶ माजी मंत्री दिलीप सोपल यांचा आरोप

**बार्शी/प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीतील पराभवाच्या धसक्यामुळे बार्शी उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रियेत मतदार यादीमध्ये बोगस मतदारांचा समावेश करून लोकशाही संपविण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न आहे असा आरोप माजीमंत्री दिलीप सोपल यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला.**

माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, माजी विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष ॲड. जीवनदत्त आरगडे, ॲड.विकास जाधव आदी उपस्थित होते. सोपल म्हणाले की 'सत्ताधाऱ्यांचा लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे स्वतःच्या कार्यकर्त्यांवर सुध्दा विश्वास राहिला नाही त्यामुळे परांडा तालुक्यातील रहिवाशांचा व्यापारी व हमालांच्या मतदार यादीत समावेश केला आहे. नियमितपणे व्यापार करणाऱ्यांना मतदार यादीत वगळले आहे. व्यापाऱ्यांच्या यादीमध्ये १०३४ व हमालांच्या यादीमध्ये १४८ बोगस मतदार आहेत. व्यापार व हमालांच्या मतदार यादीमध्ये सरकारी कर्मचारी, शिक्षक यांचा समावेश केला आहे. राऊत चाळ व दत्तनगर भागातील लोकांचा मतदार यादीमध्ये समावेश आहे. या बोगस मतदारांना हरकत घेतली आहे. बाजार समितीचे व्यापारी वर्गातील संचालक साहेबराव देशमुख यांचे नाव हेतू पुरस्सर वगळले आहे. या सदोष प्रारूप मतदार यादीला बाजार समितीचे सचिव जबाबदार आहेत.



माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांनी बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये कोणतेही गैरप्रकार सहन केले जाणार नाहीत. महाविकास आघाडी या निवडणुका समर्थपणे लढविणार आहे. विविध विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था व ग्रामपंचायत सदस्य मतदारसंघातील मतदारांमध्ये असंतोष आहे व ते आमच्या संपर्कात आहेत, त्यामुळे बोगस मतदार नोंदणीला सहकार खात्याकडे व उच्च न्यायालयातही आव्हान देणार आहोत. ॲड.जीवन दत्त आरगडे यांनी बाजार समितीमध्ये सत्तेचे केंद्रीकरण आहे त्यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी खुल्या मार्गाने व मुक्त वातावरणात बाजार समितीच्या निवडणुका पार पाडण्याची गरज आहे असे मत व्यक्त केले.

नागेश अक्कलकोटे यांनी हमाल, तोलार मतदारसंघ व व्यापारी मतदारसंघ यामध्ये खरे मतदार वगळले आहेत, असा आरोप केला. ॲड.विकास जाधव यांनी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर या सर्व बोगस मतदारांना हरकती घेतल्या असून कार्यशील मार्गाने लढा दिला जाईल असे सांगितले.

# वारकऱ्यांसाठी आता पेन्शन; राज्य सरकारचा महत्त्वाचा निर्णय

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा लाभलेली आहे. सध्या आषाढी वारी सुरू असून यानिमित्ताने लाखो भाविक विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला जात असतात. अशातच राज्य सरकारने वारकऱ्यांसाठी पेन्शन योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. परंपरेनं महिनाभर वारी करणाऱ्या वारकऱ्यांना वृद्धपकाळात राज्य सरकारकडून पेन्शन दिली जाणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय हा मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या वतीने जारी करण्यात आला आहे.**



### मुख्यमंत्री वारकरी महामंडळाची स्थापना

पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी आणि कीर्तनकारांसाठी कल्याणकारी योजना राबण्यासाठी 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय रविवार (ता.१४) रोजी घेण्यात आला. या महामंडळाच्या माध्यमातून वारकऱ्यांना सोयी सुविधा पुरवल्या जाणार आहेत. तसेच वारकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले जाणार आहे. प्रशासकीय सेवेतील अधिकारी आणि निवृत्त अधिकारी यांची महामंडळ व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. या महामंडळासाठी ५० कोटी रुपयांचे भांडवल देण्यात येणार आहे. या महामंडळाचे मुख्यालय पंढरपूरमध्ये असणार आहे.

- शासन निर्णय जारी
- राज्यातील लाखो वारकऱ्यांना वृद्धापकाळात दिलासा

### मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या महत्वाच्या योजना

- राज्यातील सर्व पालखी मार्गांचे सुधारणा, सुधारणा , स्वच्छता, आरोग्य, निवारा यांच्यासाठी दरवर्षी आर्थिक तरतूद करून नियोजन केले जाणार
- आषाढी आणि कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी सुरक्षा आणि विमा सुरक्षा कवच देण्यात येणार
- वारकरी मंडळाला भजन आणि कीर्तन साहित्य जसे की टाळ,मृदुंग, वीणा खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाणार
- कीर्तनकारांसाठी मानधन सन्मान योजना आणि आरोग्य विमा योजना राबवली जाणार
- इंद्रायणी, चंद्रभागा, गोदावरी व इतर नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी उपाययोजना राबवणार
- पंढरपूर, देहू, आळंदी , मुक्ताईनगर , सासवड, पिंपळनेर, त्र्यंबकेश्वर, पैठण, कोल्हापूर संस्थान, शेगाव, भगवानगढ, अगस्तीऋषी, संत सावता माळी समाज मंदिर अरण (तालुका माढा जिल्हा सोलापूर) व इतरही तीर्थक्षेत्रांचा विकास या महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

## माढ्यातील विठ्ठल मंदिरात उद्या महापूजा

✔ माढा/प्रतिनिधी

माढ्यात बुधवार, १७ रोजी पहाटे चार वाजता आषाढी एकादशी निमित्त कसबा पेठेतील विठ्ठलाची महापूजा करण्यात येणार आहे. चालू वर्षी लोकवर्गणीतून बांधलेल्या शिखरासह मंदिरातील श्री विठ्ठलाचे दर्शन भाविकांना मिळणार आहे.

कसबा पेठेतील ऐतिहासिक विठ्ठल मंदिरासह मंदिरावरील शिखरासह म आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. चालू वर्षी आषाढी एकादशीसाठी भाविकांनी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. महापूजा बुधवारी पहाटे नगराध्यक्षा मीनलताई साठे, उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे यांच्यासह उपस्थित भाविक - भक्तांच्या हस्ते होणार असल्याचे मंदिराचे पुजारी बापू कुंभेजकर यांनी सांगितले. सकाळी नऊ वाजता विविध मंदिरातील भजनी मंडळाच्या सहभागाने पालखीची नगरप्रदक्षिणा निघणार आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्याचे काम सुरू आहे.



माढा : मंदिरावरील बांधलेले शिखर.

माढ्यातील विठ्ठल मंदिराचे बांधकाम म्हणजे स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. हेमाडपंती मंदिर सन १७५० मध्ये उभारले राजेरावरंभा निंबाळकर यांचे चौथे सुपुत्र राजे महादजी निंबाळकर यांनी या मंदिराची उभारणी केल्याचे सांगितले जाते. याचा उल्लेख गर्भगृहाच्या पायरीवरील शिलालेखांमध्ये आजही दिसून येतो. या मंदिराची उभारणी करताना या मंदिराला शिखर बांधले गेले नाही .मुस्लिम राजवटीमध्ये हिंदूंची मंदिरे उद्ध्वस्त केली जात असल्याने या मंदिराला कळस अथवा शिखर केला नसल्याचे दिसून येते.

## आनंदश्री प्रतिष्ठानतर्फे अभंगवाणी कार्यक्रम

✔ **सोलापूर** : दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आनंदश्री प्रतिष्ठानने आषाढी एकादशीला अभंगवाणी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. दि. १७ जुलै रोजी सकाळी १० ते ११. ३० या वेळे गोविंदश्री मंगल कार्यालय जुळे सोलापूर, या ठिकाणी होणार आहे.

गायक प्राजक्ता देशपांडे, वैशाली देशपांडे, माऊली जोशी, देवश्री दंडवडे निरूपण विभावरी रणदिवे, तबला : नितीन दिवाकर, सर्वेश्वर चव्हाण, श्रेयश देव, हार्मोनियम : ओंकार पाठक, ताल-वाद्य दिलीप पोतदार हे कलाकार कार्यक्रम सादर करणार आ-हेत. वर्षभर प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या मासिक संगीत सभेत गायन सादर केलेले कलाकार आषाढी एकादशीला आपली अभंग सेवा पांडुरंग चरणी समर्पित करत असतात.

## भाविकांसाठी २१ जुलैपर्यंत विशेष रेल्वे गाड्यांची व्यवस्था

### मध्य रेल्वेकडून स्थानकावर सोयी सुविधा उपलब्ध

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आषाढी यात्रेसाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक निरज कुमार दोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर रेल्वे स्टेशनवर सुसज्ज नियोजन केले आहे. महाराष्ट्रातून आणि इतर राज्यामधून विशेष रेल्वे गाड्यांची व्यवस्था दिनांक १२ जुलैपासून ते २१ जुलै २०२४ पर्यंत केली आहेत.

सोलापूर रेल्वे विभागाने केलेले नियोजन नियमित तिकीट खिडक्या वगळता अतिरिक्त दहा तिकीट खिडक्या ची व्यवस्था रेल्वे स्थानकात मदत सहाय्यता केंद्राची व्यवस्था. अतिरिक्त शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था(अतिरिक्त पाण्याचे टॅप) पाणी टँकर २००० लिटर क्षमतेसह व्यवस्था केली आहे. अग्निशामक दल, आरोग्य रुग्णालय ची व्यवस्था स्थानिक नियंत्रण कक्ष आणि रूग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. स्थानिक रुग्णालयाबरोबर टायप करून व्यवस्था, स्टेशनवर डॉक्टर्स आणि बूथ्स नियुक्त, अतिरिक्त सीएचआय (हेल्थ निरीक्षक) आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच त्वरित कचरा निर्मूलनाची व्यवस्था ही केली आहे. पाणी आणि शौचालयांसाठी मराठी आणि हिंदीतुन साइन बोर्ड बसवण्यासाठी अतिरिक्त फॅन आणि मोठ्या प्रकाराचे लाईट ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. लेटफॉर्म आणि फूट ओव्हर ब्रिज व्यवस्थापनासाठी आरपीएफ आणि वाणिज्य कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आलेल्या आ-हेत.



### अतिरिक्त फिरते शौचालय

अतिरिक्त २४ तास सफाई कर्मचाऱ्यांच्या व्यवस्था करण्यात आली आहे. कोच सफाई ची व्यवस्था वॉटर प्रूप सुरक्षित टेंट्सची व्यवस्था रेल्वे स्थानक परिसरात सीसीटीव्ही.,स्थानिक नियंत्रण कक्ष स्टेशन व्यवस्थापक कार्यालयात व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## सर्व यंत्रणांनी दक्ष राहून काम करा, वारी यशस्वी करा

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आवाहन

✔ सोलापूर/प्रतिनिधी

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने वारकरी व भाविकांसाठी सोयीसुविधा उप-लब्ध करून दिलेल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी सुविधांची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. तसेच काही ठिकाणी रस्त्यावरील खड्डे बुजवणे, शौचालयाची संख्या वाढवणे, रस्त्यावरील होर्डिंग काढून रस्ते मोकळे करणे व अनुषंगिक सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे सर्व संबंधित विभागांनी या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करावी व पुढील तीन दिवस अत्यंत लक्ष राहून आषाढी वारी यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

भक्तनिवास येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर, महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय अधिकारी अमित माळी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश नवले, मुख्याधिकारी प्रशांत जाधव व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, आषाढी दिवशी पंढरपूर शहरात किमान दहा ते पंधरा लाख भाविक येण्याची शक्यता गृहीत धरून प्रशासनाने मागील दोन महिन्यापासून भाविकांसाठी विविध प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेप्रमाणे यामध्ये काही ठिकाणी बदल तर काही सुविधांमध्ये वाढ करण्याबाबत सांगण्यात आलेले असून त्याप्रमाणे सर्व संबंधित विभागाने अत्यंत तत्परतेने कामे पूर्ण करून घ्यावीत.

रस्त्यावरील वीज वितरण कंपनीचे पोल तसेच चौका चौकामधील होर्डिंग नगर परिषदेने त्वरित काढून घेऊन रस्ते मोकळे करावेत. तसेच रस्त्यावरील खड्डे त्वरित भरून घ्यावेत. चंद्रभागा वाळवंटातील चेंजिंग रूम ची संख्या वाढवून घ्यावी. ज्या ठिकाणी चिखल झालेला आहे अशा ठिकाणी त्वरित खडी व मुरूम भरून घेऊन पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. चंद्रभागा नदीमध्ये बोटी चालवणाऱ्या नाविकांना लाईव्ह जॅकेटचे वितरण करावे तसेच विना जॅकेट नदीमध्ये बोट चालवल्यास संबंधिताची बोट सील करण्याची कारवाई करावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.



**सोलापूर : आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद दिसत आहेत.**

### रुग्णांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या

आरोग्य विभागाने अतिदक्षता विभागात फॅन व कुलरची संख्या वाढवावी. वाखरी पालखीतळ व ६५ एकरवर आरोग्य सुविधा निर्माण केलेल्या आहेत त्या ठिकाणीही फॅन व कुलरची व्यवस्था करून घ्यावी. रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी आरोग्य पथके तयार ठेवावीत. दुचाकीवरील आरोग्य दूत सेवा अत्यंत चोख राहील यासाठी दक्ष रहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

## उद्या अमृताची फळे कार्यक्रम

✔ **सोलापूर** : आषाढी एकादशीनिमित्त बुधवार दि. १७ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता गोविंदश्री मंगल कार्यालय, जुळे सोलापूर येथे दुर्वांकुर चॅरिटेबल ट्रस्ट, च्या वतीने अभंगवाणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गायक दीपक कलढोणे हे अमृताची फळे हा अभंगगायनाचा कार्यक्रम सादर करणार आहेत.

या कार्यक्रमाचे निवेदन निवेदक अभिराम सराफ करतील तर नीरज कलढोणे, वर्धराज मिर्जी, जयंत जोशी, प्रसाद कुलकर्णी, नंदकुमार रानडे व दिलीप पोतदार हे कलाकार साथसंगत करणार आहेत. या कार्यक्रमास महाराष्ट्र बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक संजीवकुमार, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे, नगरसेवक शिवलिंग कांबळे, उद्योजक महावीर गुंडाळे, गिरीश माळवदे, संजय अजनसोंडकर, डॉ. सुरेश व डॉ नयना व्यवहारे आदी मान्यवरांच्या हस्ते विठ्ठ-रखुमाई पूजेने कार्यक्रमाची सुरूवात होईल.

## यंदा प्रथमच घडला माऊली अन् शंभू महादेवाच्या भेटीचा सोहळा

✔ नातेपुते/प्रतिनिधी

ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान यंदा प्रथमच शिंगणापूर चौक नातेपुते सरहद्दीत आल्यावर शंभू महादेवाचे पुजारी वीरभद्र कावडे स्वामी यांनी शंभू महादेवाचा बेल दावणा भस्म संपूर्ण पालखीमध्ये वाहिला. महाराजांच्या पादुकावर श्रीफळ व शाल अर्पण करूण आगळा-वेगळा ज्ञानेश्वर महाराज व श्री शंभू महादेव यांच्या भेटीचा सोहळ्याचा योग घडवून आणला. हा सोहळा पाहण्यासाठी व दर्शनाचा लाभ घेण्यासाठी लाखो भाविक उपस्थित होते.

क्षेत्र शिखर शिंगणापूर शंभू महादेव व श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी भेटीचा सोहळा संपन्न व्हावा यासाठी शिखर शिं-गणापूर शंभू महादेवाचे पुजारी वीरभद्र कावडे स्वामी यांनी आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे सोळा प्रमुख तसेच चोपदार विश्वस्तांशी संपर्क साधून हा भेटीचा सोहळा घडवून आणला.



**नातेपुते : माऊली अन् शंभू महादेवाच्या भेटीचा सोहळा कावडे स्वामी यांचा सत्कार करण्यात आला.**

ज्ञानेश्वर महाराज व शंभू महादेव हा भेटीच्या सोहळ्याची परंपरा दरवर्षी सुरू राहणार असून पुढील वर्षीही मोठ्या प्रमाणात श्री शंभू महादेव व ज्ञानेश्वर महाराज पालखी यांच्या भेटीचा सोहळा साजरा होणार असल्याचे कावडे स्वामी यांनी व्यक्त केले. यावेळी आळंदी देवस्थान कडून पुजारी वीरभद्र कावळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिखर शिंगणापूर येथील विठ्ठल कर्चे ,ऋषभ कावडे ,प्रदीप हेंद्रे ,प्रणव कावडे, विकास झांबरे तसेच शिंगणापूर येथील अनेक पुजारी उपस्थित होते.

## आषाढी वारी खा.प्रणिती शिंदेंचीसुद्धा!



**पंढरपूर : दक्षिण काशी पंढरपुरात उद्या आषाढी एकादशीचा महासोहळा संपन्न होतोय. लाडक्या विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वारकरी पंढरीत दाखल होत आहेत. दरम्यान वैष्णवांच्या समवेत सोमवारी खा.प्रणिती शिंदे यादेखील भाविक म्हणून दाखल झाल्या.**

## 'स्वेरी'चा कृषी प्रदर्शनचा उपक्रम वारकऱ्यांसाठी हिताचा : तावडे

### स्वेरीच्या संशोधन विभागाच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

आषाढी वारीच्या निमित्ताने विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरीत येत असतात. त्यांना दर्शन झाल्याचे समाधान तर मिळतेच पण त्याचबरोबर जाता जाता स्वेरीच्या ग्रामीण व कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतीविषयक मौलिक माहिती मिळते. शेतकरी-वारकऱ्यांमध्ये नवीन तंत्रज्ञान, विज्ञान आणि संशोधन रुजवण्याचे कार्य या प्रदर्शनाच्या माध्यमातून स्वेरीकडून होत आहे. हा त्यांचा स्तुत्य उपक्रम शेतकऱ्यांसाठी आनंददायी आणि हिताचा आहे.' असे प्रतिपादन राज्याचे माजी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी केले.

भाभा अणुसंशोधन केंद्र मुंबई आणि स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर (ऑटोनॉमस) यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण मानव आणि संसाधन विकास सुविधा केंद्र (आर.एच.आर. डी. एफ.) आयोजित ग्रामीण व कृषी तंत्रज्ञान प्रदर्शना'चे सोमवारी तावडे यांच्या हस्ते उदघाटन झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक-सचिव व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे हे होते. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी विजापूर, गुलबर्गा, बागलकोट, यवतमाळ, नांदेड, परभणी, सांगली, सातारा, परभणी, यवतमाळ, सोलापूर अशा विविध जिल्ह्यातील वारकरी व शेतकऱ्यांनी भेटी देवून माहिती जाणून घेतली. यावेळी पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य राजेश पांडे, मोहन डांगरे, गोपाळपूरचे सरपंच अरुण बनसोडे, उपसरपंच बाळासाहेब आसबे, डॉ.आर.एस. पवार, डॉ. पी.एम.पवार, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए.पी.केने, समन्वयक डॉ. एम.एम.अवताडे, प्रा. संतोष घाडे, बालाजी सुरवसे, स्वेरींचे प्राध्यापक वर्ग व वारकरी उपस्थित होते.




**पंढरपूर : माजी मंत्री तावडे यांचा सत्कार करताना डॉ. रोंगे. दुसऱ्या छायाचित्रात प्रदर्शनामध्ये माहिती घेताना शेतकरी.**

> मी मागील १५ वर्षापासून श्री विठ्ठलाच्या दर्शनाला येतो. स्वेरीच्या या प्रदर्शनाच्या माध्यमातून आम्हा शेतकऱ्यांना नवनवीन तंत्राची, पिके जोमाने येण्यासाठी बियाणे, पाणी, माती परीक्षण आदी शेती विषयक माहिती मिळाली. आता भविष्यात आम्ही आमच्या शेतीचा विकास करण्यासाठी या विज्ञान तंत्राचा वापर करून अधिक प्रगती करू शकतो.
>
> **-वारकरी आत्माराम काकडे, बाबापूर (ता.वणी, जि.यवतमाळ)**